प्रकरण ७

# जमीनविषयक सुधारणा

(Land Reforms)

## स्वातंत्र्यपूर्व काळातील जमीन मालकीची पद्धत

प्राचीन काळापासून हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश असल्याने राज्यकर्त्याला राज्याच्या खर्चासाठी शेतीपासूनच महसूल रूपाने पैसा मिळत होता, असा महसूल राजा आपल्या कर्मचाऱ्यांकरवी व मध्यस्थांकरवी शेतकऱ्यांकडून वसूल करीत असे. महसूल जमा करणारे मध्यस्थ हे बहुधा जमीनदार असत. ते महसूल जमा करण्याच्या कामाचा मोबदला म्हणून वसुलीचा काही भाग आपल्याकडे ठेवून बाकीचा राज्याच्या खजिन्यात भरणा करीत असत. महसूल जमा करणारे काही दलालही होते. त्यांच्या मालकीची जमीन नसे, परंतु वसुलीच्या कामापोटी काही भाग ते दलाली म्हणून घेत असत.

प्लासीच्या लढाईनंतर (१७५७) ब्रिटिशांना महसूल गोळा करण्याच्या अधिकार देणारी '**दिवाणी**' बंगालमध्ये मिळाली. त्यानुसार वॉरन हेस्टिंग्जने सरकारच्या मालकीची सर्व जमीन असते, या भूमिकेतून जमीन महसूलव्यवस्था पद्धतीत बदल करून महसूल रकमेचा लिलाव करण्याची पद्धत चालू केली. या पद्धतीमुळे महसूल वाढला, परंतु बऱ्याच वेळा सरकारला अपेक्षित महसूल मिळत नसे व युद्धासारख्या प्रासंगिक अनपेक्षित खर्चामुळे महसूल अपुरा पडत असे. त्याचप्रमाणे महसूल जमा करणारे जमीनदार, कलेक्टर वा दलाल यांना पुढील वर्षी किती महसूल जमा होईल, याचा अंदाज करता येत नसे. लिलाव पद्धतीतील हा गंभीर दोष दूर करण्यासाठी तत्कालीन गव्हर्नर **जनरल लॉर्ड कॉर्नवॉलिस** याने निश्चित स्वरूपात महसूल मिळावा म्हणून १९७३ साली '**कायमधारा पद्धती**' (Parmanent Settlement System) बंगाल, बिहार व ओरिसामध्ये लागू केली. (या पद्धतीस 'जमीनदारी पद्धती' असेही म्हटले जाते.) मांत्र ही पद्धती सर्वत्र एकसारखी लागू न करता ब्रिटिशांनी अन्य प्रदेशातील परिस्थितीनुरूप तेथे '**महालवारी पद्धत**' व '**रयतवारी पद्धत**' लागू केली.

**कायमधारा किंवा जमीनदारी पद्धती :** या पद्धतीमुळे जमीनदार केवळ महसूल गोळा करणारे मध्यस्थ वा दलाल न राहता, जमीनदारांना जमिनीची मालकी कायम स्वरूपाची, वंशपरंपरागत व हस्तांतर करण्याच्या हक्कांसहित देण्यात आली आणि **जमीन कसणारे शेतकरी केवळ कूळ (Tenant)** म्हणून राहिले. या पद्धतींमुळे शेतकऱ्याला

पूर्वी असलेले जंगले, कुरणे, कालवे, पाटबंधारे, गावठाण इत्यादींच्या वापरासंबंधीचे हक्क नष्ट झाले आणि त्यास जमीनदाराच्या कृपादृष्टीवर आपले जिणे विसंबून ठेवावे लागले.

**कायमधारा पद्धतीमुळे जमीनदारांना जमिनीची मालकी कायमस्वरूपी मिळाल्यामुळे त्यांची प्रतिष्ठा वाढली.** महसुलाची रक्कम निश्चित असल्याने त्यांनी जास्तीतजास्त जमीन लागवडीखाली आणून आपले उत्पन्न वाढविले, शेतीची भरभराट झाली, जमीनदार सधन झाले. कंपनी सरकारलाही ठराविक उत्पन्न मिळू लागल्याने कंपनी सरकारचा नोकरवर्ग वसुलीच्या कटकटीतून मुक्त झाला, वसुलीतील भ्रष्टाचार संपुष्टात आला. शिवाय कंपनी सरकारचे कायम समर्थन करणारा व पाठिंबा देणारा **जमीनदारांचा एक नवा वर्ग** तयार झाला. या पद्धतीतील जमिनीचे मोजमाप, प्रतवारी, उत्पादनक्षमता याची वास्तवदर्शी माहिती कंपनीला नसल्यामुळे महसुली उत्पन्न खोटे व अर्धवट अंदाजावर आधारलेले राहिले. यामुळे कंपनीला उत्पन्न कमी पण जमीनदाराला भरपूर मिळू लागले. जमीनदार श्रीमंत, परंतु सरकार तोट्यात अशी परिस्थिती निर्माण झाली. विनासायास श्रीमंतीमुळे जमीनदार, आपल्या जमिनीच्या व्यवस्थेसाठी एखादा दिवाण नेमून शहरात मोठ्या थाटात राहू लागला. त्यातून एक नवा **'अनुपस्थित जमीनदार'** (Absentee Landlord) वर्ग तयार झाला, या वर्गाचा जमिनीशी प्रत्यक्ष काहीच संबंध राहिला नाही. साहजिकच, शेतीही सुधारू शकली नाही. याउलट, प्रत्यक्ष शेतीवर जिवापाड कष्ट करणाऱ्या कुळाच्या हालाला पारावर राहिला नाही. शेतकऱ्याला कायद्याने थोडेफार संरक्षण दिलेले असले, तरी जमीनदार त्यास कसलेच संरक्षण देत नसे, त्याच्या नावे पट्टेही दिले जात नसत. कुळांना-शेतकऱ्यांना कोर्टात जाता येत असले, तरी दारिद्र्य व अज्ञान यामुळे कोर्टात जाण्याचे त्राण त्यांच्यात नव्हते.

**रयतवारी पद्धती** (Ryotwari System) **:** कंपनीने जमीन महसूल गोळा करण्यासाठी 'रयतवारी पद्धत' १८२२ मध्ये मद्रास, मुंबई, पूर्व बंगाल, आसामचा काही भाग व कूर्ग (म्हैसूरचा एक भाग) या प्रांतांत लागू केली. **या पद्धतीनुसार रयत शेतकऱ्यांना जमिनीची मालकी व भोगवट्याचे अधिकार दिले व शेतकऱ्यांनी जमीन महसूल थेट सरकारकडे जमा करावा,** असे ठरविण्यात आले. यामुळे सरकार व रयत-शेतकरी यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याच्या कुवतीनुसार महसूल ठरविणे, जमीन मोजणी, उत्पन्नाचा अंदाज व उत्पादनाच्या ५५ टक्के महसूल ही या पद्धतीची वैशिष्ट्ये होती.

VIVEKANAND ... Accn 54094 Date ... KOLHAPUR

रयतवारी पद्धतीमुळे सरकारला नियमित महसूल मिळाला, परंतु शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली नाही. याचे कारण मुळात महसूल खूपच जास्त ठरविला होता. १८५५ मध्ये महसूल ठरविण्याचे अधिकार स्थानिक परिस्थितीनुसार दिले गेले होते. महसुलाचे वेगवेगळे दर, जमिनीच्या उत्पादनासाठी करावा लागणारा खर्च याचा मेळ जमेनासा झाला, त्यामुळे शेतकरी निराश झाला. सावकाराची दंडेली वाढून उत्पादन घटले. एकंदरीत **या पद्धतीमुळे शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा वाढल्या व शेतीपासून पुरेसा महसूल मिळेल याची शाश्वती राहिली नाही.**

**महालवारी पद्धती** (Mahalwari System) **:** या पद्धतीनुसार **एक महाल अथवा एक विभाग यातून मिळणाऱ्या महसुलासाठी जमीनमालकास व्यक्तिशः जबाबदार धरले जात होते.** जर महाल मोठा असेल तर त्यातील काही निवडक जमीनमालकांवर महसूल वसुलीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. प्रत्यक्षात मात्र गावातील समस्त गावकऱ्यांवर संयुक्तपणे व व्यक्तिशः ही महालवारी पद्धती लागू करण्यात आली होती. ही पद्धती आग्रा, अवध व उत्तर प्रदेशातील काही प्रदेशास लागू करण्यात आली होती. जमीनदारी व रयतवारी या दोन्ही पद्धती काहीशा अपयशी ठरल्यामुळे एक सुवर्णमध्य म्हणून महालवारी पद्धती स्वीकारण्यात आली होती. निश्चित महसूल मिळावा व सरकार-रयत थेट संबंध प्रस्थापित व्हावा, महसूल जमा करण्यासाठी **लंबरदार वा मध्यस्थ नियुक्ती** व महसूल जमा कार्यावर सरकारचे थेट नियंत्रण ही या पद्धतीची वैशिष्ट्ये होती. ही पद्धती तशी **तत्त्वतः अभिनव होती, परंतु अपेक्षेनुसार तिची अंमलबजावणी झाली नाही.**

**ब्रिटिश जमीन महसूलव्यवस्थेचा परिणाम :** ब्रिटिश जमीनव्यवस्था तत्त्वतः व शब्दशः खूप चांगली होती, परंतु अज्ञानी, अडाणी शेतकरी या व्यवस्थेचा फायदा घेऊ शकले नाहीत. कायमधारा पद्धतीतून निर्माण झालेल्या जमीनदारांनी शेतीच्या विकासासाठी काहीच न करता ते फक्त उत्पन्नाचीच चिंता करीत होते, यातील बरेचसे जमीनदार आपल्या कुळावर एखाद्या सत्ताधीशाप्रमाणे अधिकार गाजवीत होते. त्यांनी एक ठराविक रक्कम महसूल म्हणून सरकारला देऊन सरकारचे अधिकारच जणू विकत घेतले होते. अशा जमीनव्यवस्थेमुळे जमीनदार सर्व गावाचा मालक झाला, गावातील आर्थिक, सामाजिक-सांस्कृतिक एकोपा नष्ट झाला, गावातील बलुतेदार, कारागीर व मजूर यांचे परंपरेने चालत आलेले आर्थिक व सामाजिक अधिकार नष्ट झाले. जमीनदाराच्या दबावाखाली व जुलूम अत्याचाराखाली त्यांना गुलामगिरीचे जीवन जगण्याची पाळी आली, यातून भूमिहीन शेतमजुरांचा एक नवा वर्गच तयार झाला.

अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी असलेली न्यायालयीन प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची व वेळखाऊ असल्यामुळे **ब्रिटिश जमीन महसूलव्यवस्था शेतीला व शेतकऱ्याला शेवटी मारकच ठरली.** हिंदुस्थानात एकेकाळी जे शेतकरी स्वावलंबी, सुखा-समाधानाचे जीवन जगत होते, ते सावकार-जमीनदार त्यांच्या दयेवर जगू लागले. थोडक्यात, **समाजजीवन उद्ध्वस्त झाले. ग्रामजीवन विस्कळीत झाले. समाजात जमीनदार व शेतकरी कुळे असे आर्थिक विभाजन करणारे दोन परस्परविरोधी वर्ग तयार झाले.**

**स्वातंत्र्यानंतरच्या जमीन सुधारणा (land Reforms after Independence)**

भारताला १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर ब्रिटिशांनी राजकीय गुलामगिरी संपुष्टात आणली असली तरी आर्थिक, सामाजिक परिस्थितीत आमूलाग्र बदल होण्याची नितांत आवश्यकता होती. हे बदल राजकीय स्वातंत्र्याप्रमाणे एका रात्रीत घडून येणारे नसतात, त्यासाठी सार्वत्रिक बदलाची क्षेत्रे आणि त्यांचे अग्रक्रम निश्चित करणे आवश्यक असते. ही प्रक्रिया दीर्घकाळ चालणारी व अनेक अडचणींनी भरलेली असते. स्वतंत्र भारताची धुरा सांभाळणाऱ्या सरकारने शेती, उद्योग इत्यादी क्षेत्रांत बदल घडवून आणण्याचे धोरणात्मक निर्णय घेऊन, प्रत्यक्ष कार्यवाहीला उत्साहाने प्रारंभ केला. **जमीनविषयक सुधारणा करण्यासाठी कायदेशीर पावले उचलणे हा स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय होता.**

**जमीनविषयक सुधारणा :** जमीनविषयक सुधारणा करण्याची प्रक्रिया मुख्यत: दोन भागात झाली. **पहिली प्रक्रिया १९६०** पर्यंत चालू होती. तिची **प्रमुख वैशिष्ट्ये** अशी होती - (१) जमीनदारी, जहागीरदारी व तत्सम पद्धती नष्ट करणे. (२) प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कुळास वा शेतकऱ्यास विशिष्ट कालमर्यादेपर्यंत हमी देणे, त्याचप्रमाणे कुळाचा खंड कमी करून त्यास जमीन मालकीचे हक्क बहाल करणे. (३) कमाल जमीनधारणा निश्चित करणे. (४) सहकारी व सामुदायिक शेती विकासाच्या कार्यक्रमाचे नियोजन करणे. पहिल्या भागातील या प्रक्रियेस संस्थात्मक सुधारणा (Institutional Reforms) असेही म्हटले जाते.

जमीन सुधारणेची **दुसरी प्रक्रिया १९६५ नंतर चालू** झाली. ही प्रक्रिया तांत्रिक सुधारणा (Technological Reforms) या नावाने ओळखली जाते. या काळात कृषिक्षेत्रात **'हरित क्रांती' (Green Revolution)** नामक विकासात्मक कार्यक्रमास सुरुवात झाली. जमीन सुधारणेच्या या दोन्ही प्रक्रिया कालानुक्रमे एकानंतर दुसरी अशा झाल्या असे नाही. साधारणपणे या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक पद्धतीने एकाच वेळी सुरू झाल्या असे म्हणता येईल.

**जमीनदारी विसर्जन (Zamindari Abolition) :** तत्कालीन मंत्री गोविंद वल्लभ यांच्या अध्यक्षतेखाली जमीनविषयक सुधारणा समितीच्या शिफारशीनुसार १९४९ च्या सुमारास उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, मद्रास, आसाम आणि मुंबई या प्रांतांत जमीनदारी विसर्जित करण्यासंबंधीची विधेयके विधानसभांमध्ये सादर करण्यात आली. याच काळात स्वतंत्र भारताची नवी राज्यघटना तयार करण्याचे काम चालू होते. जमीनदारी विसर्जित करण्यास घटना समितीतील जमीनदारांचे प्रतिनिधी कडाडून विरोध करतील, खाजगी मालमत्तेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणली जात आहे, असा कांगावा करून ते न्यायालयात जमीनदारी विसर्जित करण्याच्या प्रयत्नास आव्हान देतील, म्हणून घटना समितीच्या नेत्यांनी अशी खबरदारी घेतली की, राज्याचे विधानमंडळ निश्चित करतील त्यानुसार जमीनदारांना जमिनीची किंमत नुकसानभरपाई मिळेल. अशी नुकसानभरपाई अल्प असेल आणि ती कुळांना सहजपणे पेलता येईल इतकीच असेल. नुकसानभरपाई किती असावी, हे ठरविण्याचा अधिकार राज्यांच्या विधानमंडळांना देण्यात आला.

जमीनदारी विसर्जित करण्याबाबत घटनाकारांनी खबरदारी घेतली, तरी राज्यातील जमीनदारांनी घटनेच्या कायद्यालाच न्यायालयात आव्हान दिले. उदाहरणार्थ, पाटणा उच्च न्यायालयाने जमीनदारांचा दावा ग्राह्य धरला. म्हणून तत्कालीन बिहारच्या काँग्रेसने १९५१ साली जमीनदारी विसर्जित करण्याची योग्य तरतूद असलेली पहिली घटनादुरुस्ती करून घेतली. अशाच प्रकारच्या याचिका विविध राज्यांतील जमीनदारांनी उच्च न्यायालयात दाखल केल्यामुळे त्यांचा निर्णय देण्यासाठी पुन्हा घटनादुरुस्त्या करून घेतल्या. या संदर्भातील ४ थी व शेवटची घटनादुरुस्ती १९५५ साली मंजूर करून जमीनदारी विसर्जित करण्यासंबंधीचे विधानमंडळाचे अधिकार, मूलभूत हक्क आणि नुकसानभरपाई संबंधीची तरतूद या मुद्द्यांवर अंतिम कायदा करण्यात आला. जमीनदारी विसर्जित करण्याबाबत काँग्रेसमधील 'उजवा गट' विरोध करील असे वाटत असतानाच अनपेक्षितपणे त्यांनीही जमीनदारी विसर्जित करण्याच्या घटनात्मक तरतुदीस पाठिंबा देऊन जमीन सुधारणा करण्यास संमती दिली.

**१९५६ पर्यंत बहुतेक राज्यांनी जमीनदारी विसर्जित करण्याचे कायदे पारित केले.** या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात मुख्य अडचण अशी होती की, सरकारदप्तरी, कुळे, जमीनदार यांच्याकडे जमीन मालकीसंबंधीचे योग्य स्वरूपाचे कागदपत्र बऱ्याच ठिकाणी उपलब्ध वा पुरेसे नव्हते. तरीही लोकशाही मार्गाने एकमेकांना समजून घेऊन, दंगाधोपा-हिंसा न होता, जमीनदारी विसर्जित करण्यात सरकारला

बऱ्याच अंशी यश मिळाले. मात्र ज्या जमीनदारांनी वा बड्या शेतकऱ्यांनी स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला होता, त्यांच्या हक्कांवर जमीनदारी विसर्जित करण्याच्या कायद्यामुळे गदा आली. त्यांनी या कायद्यातील पळवाटा शोधून सरकारी प्रयत्नास पुढील काळात बरेच अडसर निर्माण केले.

**जमीनदारी विसर्जित कायद्यामुळे सुमारे २ कोटी वहिवाटदार कुळे जमीनमालक बनले.** हा आकडा काहींना अतिशयोक्त वाटला. काहीसा कारण जमीन मालकीचे बरेचसे व्यवहार 'तोंडी' (कोणत्याही कागदपत्राचा पुरावा नसलेले) झाले असले तरी १९५०-१९५१ साली एकूण ४२ टक्के कुळांपैकी १९६० पर्यंत २० ते २५ टक्के कुळे जमीनमालक बनली.

कुळांच्याकडे कसण्यासाठी असलेली जमीन कुळांच्या मालकीपोटी द्यावी लागणारी भरपाई राज्यनिहाय वेगवेगळी होती व ती अगदीच मामुली रकमेची होती. जमीनदारांना काश्मीरमध्ये अजिबात भरपाई दिली गेली नाही. पंजाबमध्ये भरपाई म्हणून अगदीच अल्प होती व तीही हप्त्याहप्त्याने बरीच वर्षे दिली जावी अशी तरतूद करण्यात आली होती. या संदर्भात बहुतेक सर्व राज्यांनी उत्तर प्रदेशाची पद्धती अवलंबली होती. त्यानुसार **छोटे व बडे जमीनदार असे दोन वर्ग** करून, जे छोटे जमीनदार वार्षिक शेतसारा म्हणून रुपये २५ देत होते, त्यांच्या जमिनीची भरपाई म्हणून जमिनीच्या वार्षिक उत्पन्नाच्या २० पट दिली, व जे बडे जमीनदार रु. २,००० ते १०,००० वार्षिक शेतसारा देत होते, त्याची भरपाई वार्षिक उत्पन्नाच्या फक्त २ ते ४ पट देण्यात आली होती. शिवाय ही भरपाई देणे कुळांच्या कुवतीबाहेर असेल, असे समजून ती दीर्घकाळात-काही प्रसंगी ४० वर्षांत देण्याची सवलत ठेवण्यात आली होती. या भरपाईपोटी काही बड्या जमीनदारांना त्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या फक्त $\frac{१}{४०}$ इतकीच रक्कम मिळाली.

**जमीनदारी विसर्जन कायद्यातील दोष**

१. **वैयक्तिक शेती** (Personal Cultivation) : जमीनदारी विसर्जित करण्याच्या कायद्याची अंमलबजावणी करीत असताना, त्यातील जे काही दोष स्पष्ट झाले, त्यात **'वैयक्तिक शेती'** हा महत्त्वाचा दोष स्पष्ट झाला. उत्तर प्रदेशातील जमीनदारी विसर्जन कायद्यानुसार जमीनदाराला स्वतःला जमीन कसावयाची असल्यास तशी 'वैयक्तिक शेती' (Personal Cultivation) कलमाखाली, त्याच्याकडे जमीन ठेवण्याची तरतूद करण्यात आली होती. 'वैयक्तिक शेती' या शब्दयोजनेची व्याख्या इतकी भोंगळ ठेवण्यात आली होती की, **वैयक्तिक शेती करणारा म्हणजे जमीन स्वतः कसणारा,** वा

जमिनीच्या कामावर स्वत: किंवा नातलगाकरवी देखरेख करणारा किंवा मशागतीसाठी भांडवल वा कर्जे देणारा म्हणजे वैयक्तिक शेती करणारा समजला जात होता. शिवाय उत्तर प्रदेश, बिहार, मद्रास प्रांतांत स्वत: कसणारा म्हणून किती जमीन जमीनदाराने आपल्याकडे ठेवावी यास कोणतीच मर्यादा नव्हती. वस्तुत: काँग्रेसने कृषीविषयक सुधारणा सुचविण्यासाठी नियुक्त केलेल्या कुमारप्पा समितीने आपल्या (१९४९) च्या अहवालात, "जो शेती कसण्याच्या कामात किमान शारीरिक कष्ट करतो व मशागतीच्या कामात प्रत्यक्ष सहभाग घेतो, तोच वैयक्तिक शेती करणारा" (Those who put in a minimum amount of physical labour and participate in actual agricultural operations.) अशी स्पष्ट व्याख्या करून आणि जमीनधारणेची कमाल मर्यादा घालून दिलेली असली, तरी या शिफारशींना डावलून, या प्रांतातील जमीनदारांनी वैयक्तिक शेतीचा बेलगाम फायदा घेतला होता. परिणामी, जमीनदारांनी आपल्या मालकीची बहुतेक सर्व जमीन 'वैयक्तिक शेती करणारा' या तरतुदीखाली आपल्या ताब्यात ठेवली व कुळांना हुसकावून लावले.

अर्थात, कुळांकडून खंड घेणाऱ्या काही बड्या जमीनदारांनी 'वैयक्तिक शेती करणारा' या सबबीखाली जमीन प्रत्यक्ष ताब्यात घेऊन प्रगत शेती करण्यास सुरुवात केली, हा या तरतुदीचा कृषीविषयक सुधारणा करण्यातील उद्दिष्ट सफल झाल्याचा एक भाग मानता येईल.

**२. संसदीय अडथळे** (Parliamentary Obstructions) **:** जमीनदारी विसर्जित करण्यासंबंधीचे कायदे राज्यांच्या विधिमंडळांनी मंजूर करावयाचे असल्याने, त्यासंबंधीचे विधेयक विधिमंडळात सादर होताच ते मंजूर होऊ नये किंवा मंजूर होण्यात विलंब व्हावा किंवा मूळ स्वरूपात मंजूर होऊ नये म्हणून जमीनदारांनी आपल्या हस्तकांकरवी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संसदीय अडथळे निर्माण केले. काही वेळा विधेयक दीर्घकाळ चर्चेत ठेवले, काही वेळा ते चिकित्सा समितीकडे (Select committee) पाठविण्याची व्यवस्था केली, काही वेळा मूळ विधेयकात शेकडो दुरुस्त्या सुचवून उद्दिष्ट विफल करण्याचा प्रयत्न केला. अशा संसदीय मार्गांचा अवलंब करून उत्तर प्रदेश व बिहार (या राज्यात हजारो एकर जमीन असलेले बडे जमीनदार होते.) या राज्यांनी विधिमंडळात जमीनदारी विसर्जन विधेयक सादर केल्यानंतर ते मंजूर होईपर्यंत अनेक वर्षे घालविली.

**३. न्यायालयीन कारवाया :** जमीनदारी विसर्जन कायदा मंजूर होऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असताना, अनेक बड्या जमीनदारांनी न्यायालयीन तरतुदींचा

आसरा घेऊन साध्या तालुका दिवाणी न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत दावे-प्रतिदावे दाखल करून अंमजबजावणी दीर्घकाळापर्यंत लांबविली. बिहारमध्ये तर सर्वोच्च न्यायालयाने जमीनदारांविरुद्ध निकाल दिल्यानंतर दुसऱ्यांदा सर्वोच्च न्यायालयाची दारे ठोठावली. न्यायालयीन निकाल झाल्यानंतर त्यांनी जमिनीचा कब्जा देण्यासंबंधीची कागदपत्रे देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे सरकारला जमीनदारांकडून कागदपत्रे मिळविण्यासाठी पुन्हा न्यायालयात जावे लागले. काही राज्यांत सरकारी महसूल अधिकाऱ्यांना विसर्जन कायद्याची अंमलबजावणी करणे जमीनदारांनी मुश्कील करून टाकले. कनिष्ठ सरकारी अधिकारी, हे एकेकाळचे जमीनदाराचे महसूल गोळा करणारे नोकरच होते. त्यांना हाताशी धरून वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचे आदेश खोट्या-नाट्या सबबीखाली पाळण्यात दिरंगाई करीत व जमीनदाराला मदत करीत असत.

थोडक्यात, **जमीनदारी विसर्जन कायद्यातील वैधानिक, न्यायालयीन व अंमल-बजावणीविषयक त्रुटींचा गैरफायदा घेऊन जमीनदारांनी या कायद्याची अंमलबजावणीच होऊ नये किंवा ती विलंबाने व्हावी,** यासाठी अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा अवलंब केला.

विसर्जन कायद्यास जमीनदारांनी कडाडून विरोध केला तरीही जमीनदारी विसर्जित करण्याची प्रक्रिया, बिहारमधील काही भागाचा अपवाद वगळता, १९६०-१९६२ पर्यंत सरकारने नेटाने पूर्ण केली. विशेषत: मोठे सरंजामदार नष्ट करण्यात सरकारला चांगले यश लाभले. **बड्या जमीनदारांना आपली शेकडो एकर जमीन कुळांच्या नावे करावी लागली, हाच प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या कुळांचा लक्षणीय लाभ होता.**

**कूळ संरक्षक कायदा** (Tenancy reforms)

जमीनदारी विसर्जित करण्याच्या कायद्याची अंमलबजावणी पूर्ण झाली तरी ज्या कुळांकडे तोंडी कराराने किंवा कोणतेही कायदेशीर नोंदीचे कागदपत्राने जमिनी आल्या होत्या, त्या जमिनी त्याच कुळांकडे राहण्यासाठी संरक्षण देण्याचा प्रश्न भलताच बिकट होता. 'वैयक्तिक काश्तकार' (Personal Cultivator) म्हणून ज्या जमिनी आपल्याकडे ठेवल्या होत्या, त्या त्यांनी कुळाकडेच ठेवल्या होत्या. शिवाय, ज्या जमीनदारांनी कुळांना जमिनी दिल्या होत्या, परंतु त्या कुळांनी उपकुळांना कसण्यास खंडाने दिल्या, त्यांचा जमीनमालकीचा प्रश्न सोडविणे गरजेचे होते. जमीनदारी विसर्जन (Abolition of Jamindari) हा प्रश्न कायमधारा पद्धतीने (Personal Settlement System) निर्माण झालेल्या जमीनदारीपुरता मर्यादित होता. याशिवाय ब्रिटिश राजवटीत 'रयतवारी पद्धत'

ही अस्तित्वात होती. जमीनदारी विसर्जन कायद्यान्वये देशातील सुमारे निम्म्या जमिनींचा प्रश्न मार्गी लागला, परंतु उर्वरित निम्म्या जमिनी रयतवारी पद्धतीच्या होत्या. रयतवारी पद्धतीतही छोटेछोटे जमीनदार होते आणि त्यांच्या जमिनी प्रत्यक्ष कसत असलेल्या कुळांचे शेकडो प्रश्न होते व ते गुंतागुंतीचे गहन होते. अशा रयतवारी पद्धतीतील कुळांना जमिनींची मालकी देण्यासंबंधी कायदेशीर तरतूद म्हणून कूळकायदा-कूळविषयक जमीन सुधारणा कायदा मंजूर करण्याचे ठरविण्यात आले.

कूळ संरक्षक सुधारणा कायद्याची **तीन उद्दिष्टे** होती. (१) ज्या कुळाकडे सलग काही वर्षे (चार वा सहा वर्षे, प्रत्येक राज्यात ही मुदत वेगवेगळी होती) कसण्यासाठी जमीन आहे, त्यांना संरक्षण देणे. (२) खंड म्हणून कुळाने द्यावयाची रक्कम कमी करून एकूण वार्षिक उत्पादनाच्या $\frac{१}{४}$ वा $\frac{१}{६}$ इतकी करणे. (३) प्रत्यक्ष कसत असलेली जमीन काही अटींवर कुळाच्या मालकीची करणे.

कुळाला जमीन मालकीसाठी जमिनीची किंमत म्हणून बाजारभावापेक्षा बरीचशी कमी किंमत द्यावी लागावी. (बहुधा शेतसाऱ्याच्या आठ किंवा दहापट) अशी तरतूद करण्यात आली. आंध्र प्रदेशात जमिनीची किंमत आठ वर्षांच्या शेतसाऱ्याइतकी - साधारणपणे ही किंमत बाजारभावाच्या ४० टक्के इतकी ठरविण्यात आली होती. कुळाला संरक्षण दिले जात असताना कूळ आणि छोटा जमीनदार या दोघांचेही हितसंबंध सलोख्याचे राहावेत, अशीही खबरदारी घेण्यात आली होती. शिवाय 'वैयक्तिक काश्तकारी' म्हणून ज्या **अनुपस्थित जमीनदाराने** (Absentee Landowner) आपल्या-कडील जमीन कुळाला कसण्यास दिली आहे, अशा कुळालाही जमीन मालकी देण्याच्या कायद्याची तरतूददेखील कूळविषयक सुधारणा कायद्यात करण्यात आली होती.

**जमीनदाराने आपल्याकडे किती जमीन ठेवावी याबाबत एक ठरावीक मर्यादा घालून देण्यात आली होती. (प्रत्येक राज्यात ही मर्यादा वेगवेगळी होती) त्याच वेळी कुळाचे हक्कही सुरक्षित करण्यात** आले होते. केरळ, ओरिसा, गुजरात, हिमाचल प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक आणि तमिळनाडू या राज्यांत जमीनदाराने स्वत:च्या कुटुंबासाठी म्हणून एकूण जमिनीच्या निम्मी जमीन ठेवावी व उर्वरित निम्मी कुळास द्यावी, अशी कायदेशीर तरतूद करण्यात आली होती. बिहार व अन्य राज्यांमध्ये निम्मी किंवा किमान पाच एकर (बंगालमध्ये अडीच एकर) जमीन कुळाकडे असावी, अशी तरतूद करण्यात आली होती. मात्र छोट्या जमीनदाराची सर्व जमीन कुळाकडे कसण्यास दिली गेली असली तरी कूळविषयक सुधारणा कायद्यान्वये अशी सर्व जमीन कुळाला देण्यात येऊ

नये अशीही तरतूद करण्यात आली होती. जे छोटे जमीनदार आहेत त्यांची आर्थिक परिस्थिती कुळापेक्षा फार काही चांगली नाही. म्हणून त्यांची सर्व जमीन त्यांच्याकडेच ठेवण्यात यावी अशी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सूचना करण्यात आली होती. या सूचनेचाही काही बड्या जमीनदारांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने स्वत:ला छोटे जमीनदार म्हणून नोंद करवून घेऊन सर्व जमीन आपल्याकडेच ठेवण्याची चलाखी केली. अशी नोंद १९७३ साली कृषीविषयक सुधारणा सुचविण्यासाठी पी. एस. अप्पू यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या नियोजन आयोगाच्या कृती दलाने (Task Force) केली होती. **बड्या जमीनदारांनी आपल्या जमिनीची खातेफोड करून ती खऱ्या–खोट्या नातेवाइकांच्या नावावर नोंदवून स्वत:ला छोटा जमीनदार ठरवून सर्व जमीन आपल्याच ताब्यात ठेवण्याची मखलाशी केली आहे,** अशी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतही नोंद केली गेली आहे.

कसणाऱ्या कुळाला हुसकून लावले जाऊ नये, म्हणून कूळविषयक सुधारणा कायद्यात संरक्षणाची तरतूद करण्यात येऊनही, कुळाला काढून टाकण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर झाले. मुंबई आणि हैद्राबाद प्रांतांत हे लक्षणीय होते. काही ठिकाणी कुळाला धमकावून आपला हक्क सोडण्याचा राजीनामा 'स्वेच्छेने' लिहून घेतल्याचेही प्रकार झाले. शेवटी चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सक्तीच्या खुशीने 'राजीनामे' लिहून घेण्याच्या प्रकारावर सरकारने बंदी घातली, व कुळाकडेच जमिनी राहतील असे कायदे करण्यात आले, परंतु कायद्याची अंमलबजावणी यथातथाच झाली. **तरीही कूळ कायद्याखाली कुळाला संरक्षण देण्याच्या तरतुदीमुळे सुमारे ६७.८ टक्के कुळांना जमिनीचे मालकीहक्क मिळाले.** या तरतुदीचा परिणाम कुळाकडून शेती उत्पादनात वृद्धी करण्यात झाला.

कूळ कायद्याखाली कुळाला 'नोकर' ठरविण्याचे प्रकारही बऱ्याच ठिकाणी घडून आले. काही जमीनदारांनी आपल्या कुळाला शेती वाट्याने करायला लावली व रोख रकमेत खंड देत असलेल्या शेतकऱ्यालाच कूळ ठरविले जाण्याची शक्कल त्यांनी लढवून आपल्या जमिनी शाबूत ठेवल्या. उत्तर प्रदेश, बंगाल या प्रांतांत असे बरेच प्रकार आढळून आले, त्यामुळे तेथील सरकारांनी कायद्यात दुरुस्ती करून या प्रकारांना काही प्रमाणात आळा घातला.

कुळाला जमीन मालकीचे संरक्षण कायद्याने मिळूनही त्याचा बिहारसारख्या प्रांतात फारसा उपयोग झाला नाही. कारण अशा प्रांतात जमिनी कुळाला तोंडी वा अनौपचारिक

बोलीने जमिनी कसण्यास देण्यात आल्या होत्या. कोणताही लेखी कागदोपत्री पुरावा वा सरकारी दप्तरात नोंदी नसल्यामुळे जमीनदाराच्याच नावावर जमिनी होत्या. बिहारमध्ये जमीनमालकच जमीन कसत असल्याच्या ९९.६ टक्के नोंदी सरकारदप्तरी होत्या. ही बाब १९६१ व १९७१ च्या जनगणनेच्या नोंदीमुळे सरकारच्या नजरेस आली. १९६१ च्या जनगणना नोंदीनुसार सुमारे ८२ टक्के कुळांना कोणतेही संरक्षण मिळाले नव्हते.

जमीनदारी विसर्जन आणि जमीनविषयक सुधारणा करण्यामध्ये सरकारदप्तरी योग्य नोंदीचा अभाव, हा फार मोठा अडथळा होता. हा अडथळा दूर करण्याचा एक भाग म्हणून उत्तर प्रदेशमध्ये तत्कालीन महसूलमंत्री चौधरी चरणसिंग यांनी काही लाख कुळांची सरकारी दप्तरात नोंद करून त्यांना जमिनीचे मालकी हक्क मिळवून दिले. केरळ आणि बंगालमधील डाव्या पक्षाच्या सरकारांनीही कुळांची सरकारदप्तरी नोंद करून कुळांना दिलासा मिळवून दिला.

## कूळ संरक्षण कायद्याच्या मर्यादा

कूळ संरक्षण कायद्याचे उद्दिष्ट चांगले असूनही, **कुळांना संरक्षण देण्यात मर्यादित यश मिळाले.** बऱ्याच कुळांना जमिनीचे मालकी हक्क प्राप्त झाले, तरी असंरक्षित कुळांची संख्याही लक्षणीय होती. केरळ व पश्चिम बंगालमधील कुळांना संरक्षण देण्याबाबत तेथील डाव्या पक्षाच्या सरकारांनी खास कायदेशीर तरतुदी केल्या व त्यांची अंमलबजावणीही तितक्याच काटेकोरपणे केली. विशेषत: कूळ संरक्षण कायद्याचे दुसरे उद्दिष्ट – कुळाने खंड म्हणून देण्याची रक्कम वार्षिक उत्पादनाच्या १/४ वा १/६ इतकी कमी करणे-पूर्ण करणे अशक्यप्राय होते. कारण उपलब्ध जमीन व लोकसंख्या यांचे प्रमाण इतके व्यस्त होते की, जमिनीच्या किमती बाजारभावाप्रमाणे सतत वाढत होत्या, अशा परिस्थितीत कुळांना कमी किमतीत जमिनीचे मालकीहक्क मिळवून देणे, सरकारलाही कठीण झाले होते.

बहुतेक सर्व राज्यांनी कुळांनी किती सारा भरावा यासंबंधी कायदे मंजूर केले होते. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात साधारणपणे एकूण ठोस उत्पादनाच्या २० ते २५ टक्के सारा देण्यात यावा, अशी बहुतेक सरकारांनी मर्यादा निश्चित केली होती. पंजाब, हरियाणा, तमिळनाडू, आंध्र प्रदेश या राज्यांनी हे प्रमाण काहीसे वाढवून ३३ ते ४० टक्क्यांपर्यंत ठेवले होते. परंतु महागाई व वाढते बाजारभाव यामुळे हे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत गेले. 'हरित क्रांती' नंतर उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे पंजाबसारख्या प्रांतात हे प्रमाण ७० टक्क्यांपर्यंत गेले. साहजिकच, गरीब असंरक्षित कुळांना इतका खंड देणे अशक्य वाटू लागले.

कूळ संरक्षण कायद्यातील तिसरे उद्दिष्ट- कुळाला मालकीहक्क मिळवून देणे पूर्वी देखील अंशतःच साध्य झाले. जमीनदारांनी स्वतः वैयक्तिक शेती करणे, कायदेशीर व बेकायदेशीररित्या कुळांना हुसकावून लावणे, सक्तीच्या खुशीचे राजीनामे, तोंडी व अनौपचारिक कराराने कुळांना जमीन देणे इत्यादी प्रकारांमुळे कुळांना जमीन मालकीहक्क देणे हे काम अतिशय कटकटीचे, कोर्ट-दरबारी कुळाला खेटे घालावे लागल्यामुळे वैतागाचे झाले. साहजिकच, जमिनीचे मालकीहक्क कुळाला सहजपणे मिळण्यास मर्यादा पडल्या.

**जमीन सुधारणाचा सर्वंकष परिणाम : जमीनदारी विसर्जित करण्याचा सर्वंकष परिणाम म्हणून सुमारे २ कोटी कुळांना जमिनीचे मालकीहक्क मिळाले.** वैयक्तिक शेती करण्याच्या मिषाने ज्या जमीनदारांनी जमिनी आपल्याकडे ठेवल्या, ते प्रत्यक्षात आपल्या जमिनीकडे लक्ष देऊन काहींनी खरोखरच जमिनी कसण्याचे मनावर घेतले. विशेषतः रयतवारी पद्धतीतील मुंबई व गुजरात प्रांतांतील निम्म्याहून जास्त जमीनदारांनी कुळांना काढून टाकून शेती करण्यास पुढाकार घेऊन प्रगत शेती करण्यास प्रारंभ केला. 'रयतवारी'मधील काही उपकुळांना मालकीहक्काची प्राप्ती झाली. (विशेषतः गुजरात व महाराष्ट्र राज्यात अशांची संख्या निम्म्यापर्यंत होती.) पश्चिम बंगालमध्ये जमीनदारी पद्धतीतील वाट्याने शेती कसणाऱ्या कुळांपैकी निम्म्या कुळांना जमिनीचे मालकीहक्क मिळाले. शिवाय पुढे कमाल जमीनधारणा कायदा मंजूर झाल्यानंतर ३० ते ३५ लाख भूमिहीनांना अतिरिक्त झालेली जमीन मालकीहक्काने मिळाली.

**कमाल जमीनधारणा (Land Ceiling)**

जमीनदारी विसर्जित करण्याइतकाच दुसरा महत्त्वाचा प्रश्न, एकाच्या मालकीची जास्तीतजास्त किती जमीन असावी, हे ठरविण्याचा होता. हिंदुस्थानात जमिनीची मालकी अत्यंत विषम पद्धतीने अस्तित्वात होती. **एखाद्याकडे हजारो एकर जमीन तर दुसरा पूर्णतः भूमिहीन होता. म्हणून जमिनींचे समान वाटप करणे हा जमीन सुधारणेतील एक महत्त्वाचा टप्पा होता.** अर्थात, सर्वतोपरी जमिनीचे वाटप समान करणे अशक्य होते. तरीही एखाद्याकडे कमाल जमीन किती असावी, हे निश्चित झाल्यानंतर अतिरिक्त झालेली जमीन भूमिहीनांना देता येईल, हा या जमीन सुधारणा प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग होता.

कमाल जमीनधारणा (Land Ceiling) प्रश्नावर सामाजिकदृष्ट्या फारशी उत्सुकता नव्हती आणि जागरूकता तर मुळीच नव्हती, असेही म्हटल्यास फारसे वावगे ठरणार

नाही. अर्थात, या सामाजिक उदासीनतेमुळे कमाल जमीनधारणा प्रश्नांची सोडवणूक करण्यात अनेक अडचणी उभ्या राहिल्या. राष्ट्रीय काँग्रेस आणि किसानांच्या संघटना या प्रश्नावर बऱ्याचशा सक्रिय होत्या.

राष्ट्रीय काँग्रेस स्वातंत्र्यानंतर प्रथमच कमाल जमीनधारणा प्रश्नावर गांभीर्याने विचार करू लागली. १९४६ साली **'ऑल इंडिया किसान सभा'** या शेतकऱ्यांच्या संघटनेने जास्तीतजास्त २५ एकर जमीन एकाच्या मालकीची करण्याची मागणी केली. काँग्रेसने नोव्हेंबर, १९४७ मध्ये प्रथमच पंडित नेहरूंच्या अध्यक्षतेखाली आर्थिक कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यासाठी एक समिती नियुक्त केली होती. या समितीने अशी शिफारस केली की, "The maximum size of holding should be fixed. The surplus land over such a maximum should be acquired and placed at the disposal of the village co-operatives." त्याच वेळी जे. सी. कुमारप्पा यांच्या अध्यक्षतेखाली **'काँग्रेस ॲग्रेरियन रिफॉर्म कमिटी'** नियुक्त करण्यात आली, आणि या समितीने जुलै, १९४९ मध्ये सादर केलेल्या अहवालात अशी शिफारस करण्यात आली होती की, एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंब आणि त्याची एक बैलजोडी यांना पूर्ण रोजगार मिळून त्याचा निर्वाह चालण्यास पुरेसे आर्थिक उत्पन्न देण्यास जेवढी जमीन लागते, त्याच्या तिप्पटीएवढी जमीन कमाल जमीन म्हणून एका कुटुंबाकडे असावी. (Ceiling on land holding was to be three times the size of an 'economic holding.' An economic holding being defined as that which would give a reasonable standard of living to the cultivator and provide full employment to a family of normal size and at least to a pair of bullocks.)

पहिल्या पंचवार्षिक योजनेतही (१९५१-१९५६) एका व्यक्तीकडे कमाल जमीन किती असावी हे ठरविण्याचे तत्त्वत: मान्य करण्यात आले होते. कुमारप्पा समितीने कमाल जमीन किती असावी हे प्रत्येक राज्याने आपल्या शेतीचा इतिहास आणि तिची उत्पादकता याचा अभ्यास करून निश्चित करावी अशी शिफारस केली होती. हा प्रश्न तातडीचा नसल्याने त्यात चालढकल चालली होती. पुढे ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या १९५३ सालच्या आग्रा अधिवेशनात, प्रत्येक राज्याने एकूण जमीन व कमाल जमीन निश्चिती केल्यानंतर उर्वरित जमीन भूमिहीनांना कशा प्रकारे वाटप करता येईल, याची संपूर्ण माहिती तातडीने गोळा करावी, असा ठराव केला. त्यांनतर १९५७ पर्यंत काँग्रेस अधिवेशनात कमाल जमीनधारणा प्रश्नाचा पुनरुच्चार करण्यात आला. शेवटी १९५७ मध्ये **'नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल'**च्या स्थायी समितीने असा निर्णय जाहीर केला की,

ज्या राज्यांनी कमाल जमीनधारणा कायदा मंजूर केला आहे, त्यांनी १९६० च्या अखेरपर्यंत त्याची अंमलबजावणी करावी व अन्य राज्यांनी १९५८–१९५९ पर्यंत कमाल जमीनधारणा कायदा मंजूर करून घ्यावा.

**कमाल जमीनधारणा कायद्यास विरोध :** केंद्र सरकारच्या कमाल जमीनधारणा निर्णयास देशाच्या सर्व भागांतून विरोध प्रकट होऊ लागला. वृत्तपत्रे, संसद, राज्यविधिमंडळे आणि काँग्रेस पक्ष या सर्वांनी या निर्णयावर टीका करण्यास सुरुवात केली. **'खाजगी मालमत्ता' या मूलभूत हक्कास बाधा आणणारा हा निर्णय आहे अशी ओरड ग्रामीण भागातील जमीनदार व नागरी भागातील हितसंबंधीय यांनी केली.** जानेवारी, १९५९ च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनात हा प्रश्न मांडण्यात आला त्या वेळी प्रमुख काँग्रेस नेत्यांनी या प्रश्नाचे गांभीर्य व निकड ओळखून '१९५९ च्या अखेरपर्यंत राज्यांनी कमाल जमीनधारणा कायदा मंजूर करून घ्यावा व अतिरिक्त जमीन पंचायतीकडे सोपवावी व पंचायतीने भूमिहीनांच्या मदतीने सहकारी तत्त्वावर तिची मशागत आदी कामे पार पाडावीत.' असा आदेशवजा ठराव मंजूर करून घेतला. नागपूर अधिवेशनानंतर कमाल जमीनधारणा निर्णयावर विरोधाची लाटच उसळली. फेब्रुवारी, १९५९ मध्ये काँग्रेसचे सरचिटणीस प्रा. एन. जी. रंगा या विद्वान वयोवृद्ध नेत्याने पंडित नेहरूंना कमाल जमीनधारणा निर्णयावर कठोर टीका करणारे पत्र पाठवून आपला राजीनामाही सादर केला. आणखी एक काँग्रेसचे दिग्गज नेते सी. राजगोपालाचारी व मिनू मसानी यांनी प्रा. रंगा यांच्या सुरात सूर मिसळला व त्यांनी जून, १९५९ मध्ये 'स्वतंत्र पार्टी' नावाचा उजव्या विचारसरणीचा उद्घोष करणारा नवा राजकीय पक्षही स्थापन केला. विशेष म्हणजे जमीनदारी विसर्जित केल्यानंतर त्याचा लाभ मिळालेल्या नव्या जमीनमालकांनीही कमाल जमीनधारणा निर्णयास कसून विरोध केला.

कमाल जमीनधारणा निर्णयास विरोध करणाऱ्यांना आपला विजय, राज्यांच्या विधिमंडळाकडे हा प्रश्न आल्यानंतर, सहजपणे मिळविता आला. कारण कमाल जमीनधारणा विधेयक राज्यांकडे येणार होते व मंजुरीनंतर कायद्याची अंमलबजावणीही राज्याच्या सरकारलाच करावी लागणार होती. नागपूर अधिवेशनानंतर ज्या राज्यांच्या विधिमंडळाची अधिवेशने सुरू झाली, त्यांना नागपूर अधिवेशनातील ठरावानुसार कमाल जमीनधारणा विधेयक विधिमंडळात मांडण्याची अजिबात घाई नव्हती. असा कमाल जमीनधारणा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित राहिला आणि या प्रश्नाची अधिकृतपणे नांदी झाल्यानंतर सुमारे १४ वर्षांनी, १९६१ च्या अखेरीस काही राज्यांनी कमाल जमीनधारणा विधेयकाचे कायद्यात रूपांतर केले.

**कमाल जमीनधारणा कायद्याची परवड :** कमाल जमीनधारणा करण्याची मूळ कल्पना १९४७ साली मांडली व १९६१ साली तिचे कायद्यात रूपांतर झाले. इतका दीर्घकाळ व कायद्यातील त्रुटी यामुळे कायद्याच्या मूळ उद्दिष्टाचाच पराभव झाला. ज्या राज्यांनी हा कायदा मंजूर केला त्यात बऱ्याच त्रुटी – (कदाचित हितसंबंधीयांच्या प्रयत्नांमुळे जाणूनबुजून ठेवल्या असाव्यात, अशी शंका रास्तपणे व्यक्त करण्यात आली होती) – राहून गेल्या होत्या. महत्त्वाच्या त्रुटी अशा होत्या.

१. कमाल जमीन मर्यादा फार जास्त ठेवण्यात आली. बहुतेक राज्यांतील ७० टक्के जमीनमालकांकडे ५ एकरांपेक्षा जास्त जमीन नव्हती. ज्या १५/२० टक्के जमीनमालकांकडे थोडी जास्त जमीन होती त्यांच्यासाठी कमाल जमीन मर्यादा असली वा नसली तरी कायद्याचा त्यांना अंकुश लागत नव्हता. उदाहरणार्थ, कायद्याने निश्चित केलेली कमाल जमीन मर्यादा एकरात आंध्र प्रदेश २७ ते ३१२, आसाम ५०, केरळ १५ ते ३७.५, पंजाब ३० ते ६०, पश्चिम बंगाल २५, महाराष्ट्र १८ ते १२६ मर्यादेपेक्षा जास्त जमीन असलेले जमीनमालक २ ते ५ टक्क्यांहून जास्त नव्हते. त्यामुळे भूमिहीनांना वाटपासाठी फार मोठी जमीन उपलब्ध होऊ शकली नाही.

२. कमाल जमीनधारणा, फक्त एका व्यक्तीसाठी ठेवण्यात आली होती, कुटुंबासाठी नव्हती. त्यामुळे मर्यादेपेक्षा जास्त जमीन असलेल्या जमीनदारांनी अतिरिक्त जमीन आपल्याच कुटुंबातील इतर व्यक्तींच्या नावे करण्याची चलाखी करून कायद्यातून सुटका करून घेतली.

३. जर जमीनदाराच्या कुटुंबाचा विस्तार जास्त असेल तर त्या प्रमाणात जमीन मर्यादा वाढविण्याची कायद्यात तरतूद करण्यात आली होती. उदाहरणार्थ, कायद्यात नमूद केली आहे त्यापेक्षा वाढ केरळ ६७ टक्के, मध्य प्रदेश ९० टक्के, बिहार, मद्रास व महाराष्ट्र १०० टक्के, त्रिपुरा १४० टक्के आंध्र प्रदेशात तर मर्यादाच ठेवली नाही. कुटुंबातील प्रत्येक सभासदामागे ६ ते ७२ एकर वाढ. फक्त जम्मू–काश्मीर, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश आणि पंजाब या राज्यांत कुटुंबाच्या विस्ताराच्या प्रमाणात कोणतीच वाढ ठेवण्यात आली नव्हती.

४. कमाल जमीनधारणा कायद्यातून काही जमिनी वगळल्या होत्या. उदाहरणार्थ, चहा, कॉफी, रबर यांचे मळे, पाळीव जनावरांसाठी असलेली विशेष जमीन, मुख्यतः दुग्धव्यवसाय, शेळी–मेंढी पालन, बागा, साखर कारखान्यांकडे असलेले ऊसमळे. ही कृती मोठ्या भांडवलदार जमीनदारांवर केलेली कृपादृष्टीच होती.

५. कमाल जमीनधारणा कायदा करण्यात वाया गेलेला दीर्घकाळ मोठ्या जमीनदारांना अत्यंत फायदेशीर ठरला. अशा प्रकारचा कायदा होण्याची शक्यता आहे हे ओळखून

मोठ्या जमीनदारांनी जमिनीचे कुटुंबनिहाय कायदेशीर वाटप करून घेतले, जमिनी विकून टाकल्या. नातेवाइकांच्या नावावर खातेफोड करून घेतली, कुळांना हुसकावून लावले आणि मर्यादेच्या आत राहील एवढीच जमीन आपल्या नावावर ठेवण्याची त्यांनी खबरदारी घेऊन कायद्यातून सुटका करून घेतली. त्यामुळे सरकारला अतिरिक्त जमीन मिळाली नाही व भूमिहीनांना समान वाटप करण्याचे उद्दिष्ट सफल झाले नाही.

अशा प्रकारे १९६१ पर्यंत कमाल जमीनधारणा कायदे बहुतेक राज्यांनी मंजूर केले तरी १९७० पर्यंत बिहार, म्हैसूर(कर्नाटक), केरळ, ओरिसा आणि राजस्थान राज्यांतून अतिरिक्त म्हणून भूमिहीनांना वाटपासाठी एक एकरही जमीन उपलब्ध झाली नाही. आंध्र प्रदेशात १४०० एकर जमीन अतिरिक्त म्हणून जाहीर झाली, परंतु तिचे वाटप झाले नाही. फक्त जम्मू-काश्मीर राज्यात कमाल जमीनधारणा कायद्याची पूर्णपणे अंमलबजावणी झाली व सुमारे २३,००० एकर अतिरिक्त जमीन उपलब्ध झाली आणि ती मूळ जमीन मालकाला काहीही भरपाई न देता कुळांना व भूमिहीनांना वाटून देण्यात आली.

सर्व भारतात सुमारे २४ लाख एकर अतिरिक्त जमीन १९७० पर्यंत उपलब्ध झाली आणि त्यापैकी $\frac{३}{१०}$ एकर जमिनीचे वाटप झाले.

जमीन सुधारणांची अंमलबजावणी करण्याचे काम १९७० नंतरही पुढे चालू राहिले. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जमीन सुधारणा कार्यक्रमाला गती देण्यासाठी १९७० मध्ये राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक परिषद बोलावली. त्यात त्यांनी प्रतिपादन केले की, ''राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात जमीन सुधारणासंबंधी लक्षावधी शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या होत्या, परंतु स्वातंत्र्यानंतर जमीन सुधारणा कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली नाही.'' त्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर असे आवाहन केले की, ''नव्या कृषी धोरणात अल्पभूधारक शेतकरी कुळे, भूमिहीन मजूर यांना सहभागी होता येईल अशी परिस्थिती निर्माण करणाऱ्या संस्था उभ्या करावयाच्या आहेत.'' अशा प्रकारच्या जमीन सुधारणा अमलात आणावयाच्या काळात नक्षलवादी चळवळीचा उदय झाला. अर्थात, यापूर्वी जमीन सुधारणांचा एक भाग म्हणून आचार्य विनोबाजींनी १९५१ साली भूदान चळवळ सुरू केली.

**भूदान चळवळ (Bhoodan Movement)**

रत्ने शोधण्यासाठी म्हणून कुणीतरी बाहेर पडत असेल आणि त्यास रत्न सापडले असे सहसा होत नाही. तसेच काहीसे 'भूदान' संकल्पनेचे रत्न सापडले आहे. भारताची फाळणी झाल्यानंतर देशभर जातीय दंगली उसळल्या, त्या शांत कशा कराव्यात यासाठी सर्वोदयवादी नेते प्रयत्न करीत होते. त्या नेत्यांमध्ये म. गांधींचे सर्वोत्तम शिष्य विनोबा

भावे अग्रभागी होते. दंगली शमवण्यासाठी त्यांची पदयात्रा चालू होती. दंगली शांत करण्याच्या प्रयत्नांत त्यांना अपेक्षित यश येत नव्हते. या प्रश्नावर मुळापासून विचार करायला लागल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, **देशातील विषमतेचे मूळ पैशात आहे, सर्व समस्या पैशाशी निगडित आहेत, या पैशाला, या मोहाला जर आयुष्यातून दूर केले तर सर्व समस्या सहजपणे सुटतील, अशी त्यांची खात्री झाली. 'पैसा सामाजिक जीवन दूषित करतो, म्हणून त्याला सार्वजनिक जीवनातून वजा करणे आवश्यक आहे,'** असा मूलभूत विचार त्यांनी मांडला. त्या दृष्टीने त्यांनी **'ऋषी शेती'**चा पवनार आश्रमात सुरू केलेला प्रयोग कमालीचा यशस्वी झाला. हा प्रयोग खेड्यात किती प्रमाणात यशस्वी होतो, याचा अनुभव घेऊन तो साऱ्या देशासमोर ठेवावा, या विचाराने ते पवनार आश्रमातून बाहेर पडले या भ्रमंतीत त्यांना 'भूदान' संकल्पनेचे रत्न सापडले.

**'भूदान' संकल्पना**

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जमीन मालकीच्या संबंधी सुधारणा करण्याचा प्रश्न हाती घेतला. त्या दृष्टीने १९५१ सालापासून घटनादुरुस्त्या करून, जमीन सुधारणा करीत ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्यांची निर्गत करण्याचा कायद्यांच्या पातळीवर प्रयत्न सुरू केला होता. **'भूदान' हा सुद्धा जमीन सुधारणेचाच एक भाग होता.** जमिनीची मालकी अगदी विषम प्रमाणावर होती. एकीकडे हजारो एकर जमीन एखाद्या जमीन-सरंजामदाराकडे तर दुसरीकडे एकर-अर्धा एकर जमिनीचा तुकडा दुसऱ्या एकाकडे किंवा पूर्णतः भूमिहीन अशी स्थिती होती. ही विषमता सरकार आपल्यापरीने कायद्याद्वारे जमिनीची विषम मालकी कमी करण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु ही **विषमता कमी करण्याचा कायदेशीर मार्ग न अवलंबता केवळ जादा जमीन असलेल्या जमीनदारांच्या मालकीहक्काचे परिवर्तन त्यांच्या हृदय परिवर्तनाद्वारा करणे, त्याच्या त्यागमय सदसद्-विवेकबुद्धीला आवाहन करून, स्वतःहून त्याने जमीन देणे, भूदान करणे ही भूमिका भूदान संकल्पनेच्या मागे होती.** भूदान हा एक अभूतपूर्व प्रयोग होता. आचार्य विनोबा भावे, यांनी म. गांधीजींच्या सर्वोदयी मार्गाने हा प्रयोग यशस्वी करण्यासाठी त्यांनी पवनार आश्रमातून पदयात्रेस प्रारंभ केला.



विनोबा भावे

**आचार्य विनोबा भावे आणि भूदानाचा जन्म**

देशाला आचार्य विनोबा भावेंची ओळख **'भूदान आंदोलनाचे पुरस्कर्ते'** अशीच आहे. अर्थात, भूदान आंदोलन हा विनोबाजींच्या प्रदीर्घ देशसेवेचा एक भाग आहे. आपल्या उण्यापुऱ्या ८७ वर्षांच्या जीवनात त्यांनी बहुविध कार्यक्षेत्रांत जी उत्तुंग शिखरे गाठली आहेत त्याने

कुणीही सामान्य माणूस दीपून जाईल. 'जय जगत'ची घोषणा देणारा अखिल भारतीय **कीर्तीचा हा माणूस 'मराठी' आहे याचा सर्वांना अभिमान वाटेल.**

कोकणातील रायगड जिल्ह्यात पेण तालुक्यातील गागोदे या खेड्यात विनोबांचा **जन्म ११ सप्टेंबर, १८९५ रोजी झाला.** याच खेड्यातील निसर्गाचे आणि आपल्या इनामदार भावे घराण्याचे संस्कार विनोबाजींचे आयुष्य संपन्न करण्यास कारणीभूत ठरले. जन्मगावीच अंकगणित, इसापनीती, रामायण, महाभारत आणि अन्य रूपात त्यांची शैक्षणिक तयारी झाली होती. जात्यःच अत्यंत तल्लख बुद्धीचा असल्याने लहान वयातच **थोरो, कार्लाइल, इमर्सन अशा प्रतिभावान पाश्चात्त्य ग्रंथकारांची त्यांची ओळख झाली होती.** दांडगे पाठांतर असल्याने दासबोध, मोरोपंतांची केकावली व आर्या त्यांना मुखोद्गत होत्या. त्यांचे अफाट सततचे वाचन डोळ्यांना कायमचे अधू करणारे ठरले. मुंजीच्या **वेळीच आजन्म ब्रह्मचारी राहण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली होती आणि गृहत्यागाची प्रेरणा गौतम बुद्ध, शंकराचार्य आणि संत रामदास यांच्यापासून घेतली होती.** गौतम बुद्धांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून १९१६ मध्ये त्यांनी गृहत्याग केला आणि काशीला येऊन द्वैत आणि अद्वैत या वादविवादात भाग घेऊन त्यांनी सर्वांना चकित करून सोडले.

**विनोबांची व महात्मा गांधीजींची पहिली भेट १९१६ मध्ये एका आश्रमात** झाली. महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखाली, एक परिपूर्ण सत्याग्रही, म्हणून विनोबांची तयारी झाली. महात्मा गांधींच्या आदर्शानुसार राष्ट्रकार्यात ते भाग घेत असले तरी प्रत्यक्षात त्यांनी १९२१ मध्ये अधिकृतपणे काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारले. देशभरात चाललेल्या ब्रिटिशविरोधी सत्याग्रहात त्यांना १८ जून, १९२३ रोजी अटक झाली व त्यांना वर्षभराची तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९२१ मध्ये ते वर्धा येथील सत्याग्रहाश्रमात दाखल झाले. १९२१ ते १९४० या काळात आश्रमात असताना अनेक विषयांवर ग्रंथलेखन केले. ३०० गावांची पाहणी करून **'स्वयंपूर्ण खेडे'** उभे करण्यासाठी १९३४ मध्ये **'ग्रामसेवा मंडळ'** स्थापन केले. या मंडळाच्या कामाचा एक भाग म्हणून त्यांनी **'महारोगी सेवा मंडळ'** स्थापन केले. जंगल सत्याग्रहात भाग घेतला. मराठीतील अजरामर कलाकृतींपैकी एक समजली जाणारी **गीताई** त्यांनी १९३०-३१ मध्ये लिहिली, तसेच त्यांनी १९७४ मध्ये **'गीता प्रतिष्ठान'** स्थापून करून गीता प्रवचनाबरोबर **'अस्पृश्यता निवारण,' 'सर्वांसाठी मंदिर खुले'** असे कार्यक्रम राबवले. १९४० साली त्यांनी युद्धविरोधी भाषण करून भाषणस्वातंत्र्याचा हक्क बजावत, महात्मा गांधीजी पुरस्कृत **'पहिला वैयक्तिक सत्याग्रह'** केला. स्त्री शिक्षण, साक्षरता प्रसार अशा अनेक समाजोपयोगी कार्यात त्यांनी भाग घेऊन आदर्श समाजसेवा कशी असते, याचे साक्षात उदाहरण सर्वांसमोर ठेवले. अर्थात, त्यांचे 'भूदान' चळवळीचे त्यांनी केलेल्या कार्यामुळेच ते सर्व परिचित झाले.

## भूदान : विचार आणि कार्य

आचार्य विनोबा भावे राष्ट्रासाठी सर्वस्व वाहिलेले राष्ट्रसंत म्हणून जसे भारतीयांना ज्ञात आहेत, तितकेच ते भूदान यज्ञाचे ऋषी म्हणून सर्वजण जाणतात. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी राष्ट्रसेवा मनोभावे चालू ठेवली होतीच. **'सर्वोदय समाज'** हा त्यांच्या या काळातील अंगीकृत कार्याचा भाग होता. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर भारतात काही भागात जातीय दंगली चालू झाल्या होत्या, त्या शांत करण्यासाठी त्यांची देशभर पदयात्रा चालू होती. तरीही त्यांच्या कार्याचा त्यांना अपेक्षित परिणाम दिसत नव्हता, म्हणून या प्रश्नावर मुळापासून विचार करायला लागल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, (१) देशातील विषमतेचे मूळ पैशात आहे; सर्व समस्या पैशाशी निगडित आहेत. या पैशाला, या मोहाला जर आयुष्यातून दूर केले तर सर्व समस्या सहजपणे सुटतील. अशी त्यांची खात्री झाली. **('तृष्णा हे सर्व दु:खाचे मूळ आहे या गौतम बुद्धांच्या विचारांशी साम्य असलेली ही विचारधारा आहे.)** म्हणून विनोबांनी पैशापासून मुक्ती मिळवण्यासाठी **'कांचनमुक्ती प्रयोग'** करण्याचे त्यांनी ठरवले. 'सोने-नाणे मृत्तिकेसमान' या स्वभावधर्मानुसार त्यांनी (२) व्यक्तिगत जीवनात जसा अपरिग्रह पाहिजे तसाच तो सामाजिक संस्थामध्ये अपरिग्रह आल्यास समाज त्यागाच्या एका वेगळ्या उंचीवर जाऊन पोचेल, असा त्यांचा विश्वास होता. (३) 'पैसा सामाजिक जीवन दूषित करतो म्हणून त्याला सार्वजनिक जीवनातून वजा करणे आवश्यक आहे.' असा मूलभूत विचार त्यांनी मांडला. (४) त्या दृष्टीने त्यांनी 'ऋषी शेती'चा प्रयोग केला आणि पवनार आश्रमातून सुरू केलेला हा प्रयोग कमालीचा यशस्वी झाला. (५) 'हा प्रयोग खेडेगावात वाटायचा आहे आणि तो खेडेगावात किती प्रमाणात यशस्वी होतो, याचा अनुभव घेऊन तो साऱ्या देशासमोर ठेवायचा आहे' अशा विचाराने ते पवनारमधून बाहेर पडले.

### भूदान यज्ञातील पहिली समिधा : पोचमपल्ली (तेलंगण) १८ एप्रिल, १९५१

म. गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगली शांत करण्याच्या निमित्ताने विनोबाजी आंध्र प्रदेशातील तेलंगणात भ्रमंती करीत होते. त्या भागातील साम्यवादी, श्रीमंत जमीनदार आणि सामान्य जन यांची तेथील जमीन मालकीशी नाळ जोडलेली आहे व त्यातूनच सर्व समस्या गंभीर बनल्या आहेत. **१८ एप्रिल, १९५१ रोजी विनोबांनी पोचमपल्ली येथे आल्यानंतर तेथील परिस्थिती समजून घेऊन, 'भूमी समस्या हीच एकमेव समस्या' आणि त्यावर तोडगा काढल्यास, पुढील समस्या सुटणे अवघड नाही,** म्हणून त्यांनी प्रथेप्रमाणे हरिजन वस्तीला भेट दिली, तिथल्या लोकांनी आपल्या व्यथा **'आम्हाला ८० एकर जमीन मिळाल्यास आमचे सारे प्रश्न सुटतील.'** या शब्दांत सांगितल्या. विनोबांनी या

प्रश्नावर सखोल विचार यापूर्वीच केला होता. ते म्हणाले, **'मी तुम्हाला जमीन मिळवून दिली, तरी तुम्हाला सगळ्यांना मिळून काम करावे लागेल, प्रत्येकाला वेगळी जमीन मिळणार नाही.'** सर्वांचा होकार तत्काळ मिळाला. एवढ्यात पोचमपल्लीतील एक सधन शेतकरी रामचंद्र रेड्डींनी जाहीर केले. **'मी देतो शंभर एकर जमीन!' भूदान यज्ञातील श्री. रामचंद्र रेड्डींची पहिली समिधा अशी पडली. भूदानाचा असा जन्म झाला.**

विनोबाजी या घटनेबद्दल सांगतात, **''मी जमीन मागितली आणि जमीन मला मिळाली, यात मला ईश्वरी संकेत दिसतात... देव म्हणाला,**

१. 'अहिंसेवर जर तुझी श्रद्धा असेल, तर तुला संधी मिळाली आहे. तू मागत जा. तुला जमीन मिळेल.'

२. 'हवा, पाणी, सूर्यप्रकाश हे जसे देवाने निर्माण केले आहे आणि त्यावर जसा सर्वांचा समान अधिकार आहे, त्याचप्रमाणे ही जमीनही देवानेच निर्माण केली आहे.'

३. 'भूदान यज्ञ भारतीय संस्कृतीला अनुसरून आहे.'

४. कायदा आणि कत्तलीने जो प्रश्न सुटत नव्हता तो विनोबाजींनी करुणेने सोडवला.

५. पंडित नेहरू म्हणतात, ''शस्त्रांनी जो परिणाम झाला नव्हता तो विनोबाजींचे शब्द आणि कृती यातून विलक्षण सामर्थ्याने घडून आला.''

**भूदान चळवळीस अभूतपूर्व प्रतिसाद :** भूदान चळवळीत पोचमपल्ली येथून १८ एप्रिल, १९५१ रोजी मिळालेला भूप्रसाद घेऊन विनोबांनी प्रस्थान ठेवले. दररोज बारा-पंधरा मैल पायी चालत मजल-दरमजल करीत सारा भारत त्यांनी पायाखाली घातला. शेकडो-हजारो भूदान चळवळीतील कार्यकर्ते त्यांच्या प्रत्येक पदयात्रेत सामील झाले होते. चळवळीस मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादामुळे भूदानाच्या जगभर अनुकूल प्रतिक्रिया उमटल्या. **विनोबाजींचा एप्रिल, १९५१ मध्ये सुरू झालेला झंझावात दिल्ली-मीरत-कानपूर-बिहार-बंगाल-ओरिसा-आंध्र प्रदेश-तमिळनाडू-केरळ-कर्नाटक-महाराष्ट्र-गुजरात-राजस्थान-पंजाब-काश्मीर इत्यादी राज्ये पालथी घालीत १० एप्रिल, १९६४ रोजी महाराष्ट्रात शांत झाला.** १३ वर्षे तीन महिने ३ दिवस चाललेल्या या पदयात्रेने ८० हजार किलोमीटरचे अंतर कापले, शेकडो एकर जमीन मिळाली. याच काळात ज्या राज्यात त्यांची पदयात्रा चाले त्या-त्या राज्यातील जातीय दंगली, राजकीय नेत्यांच्या भेटी, सर्वोदय संमेलने इत्यादी कार्यक्रमांना ते उपस्थित राहून अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करीत असत. भूदान चळवळीत गावोगाव जमिनींचे दान मिळालेच, परंतु पुढे या दानाची परिणती ग्रामदानांत झाली. संपूर्ण गावाची जमीन विनोबांना दान म्हणून दिली जात असे, हा ग्रामदानाचा प्रयोग विलक्षण होता. याही पुढे १५ ऑगस्ट, १९५८ रोजी पूर्व खानदेशमधील अख्खा अक्राणी तालुका, ग्रामदानी तालुका म्हणून जाहीर झाला.

बिहारमधील बोधगया येथील १९५४ सालच्या सर्वोदय संमेलनास जयप्रकाश नारायण उपस्थित होते. विनोबाजींच्या भूदान, संपत्तीदान, समयदान करण्याच्या आवाहनामुळे जयप्रकाशजी इतके भारून गेले की, त्यांनी संमेलनात 'मी जीवनदान करतो' अशी जाहीर घोषणा केली. विनोबाजींच्या कार्यास यापेक्षा मोठी पावती कोणती असणार!

**भूदान चळवळीचे मूल्यमापन**

**विनोबाजींच्या भूदान चळवळीचे 'ग्रामदान' चळवळीत रूपांतर झाले.** 'ग्रामदान' म्हणजे गावाच्या जमिनीची मालकी कोणाएकाची न होता सामुदायिकपणे गावातील सर्व लोकांची जमीन होय. ग्रामदानापूर्वी त्या गावातील कोणी मोठा जमीनदार असेल, कोणी अल्पभूधारक असेल तर कोणी भूमिहीनही असेल, परंतु 'ग्रामदान' झालेल्या गावातील जमीन सर्वांची सामुदायिकपणे होत असे. ग्रामदान मोहीम सर्वांत जास्त यशस्वी ओरिसामध्ये झाली. ग्रामदान मोहीम ओरिसामध्ये सुरू झाली आणि महाराष्ट्र, केरळ, आंध्र प्रदेश आणि मद्रास (आजचा तमिळनाडू) या राज्यांत मोठ्या प्रमाणावर 'ग्रामदाने' झाली. १९६० च्या अखेरीस ओरिसा ४५०० हून जास्त, महाराष्ट्र ६०३, केरळ ५४३, आंध्र प्रदेश ४८३ आणि मद्रास २०३ इतकी गावे ग्रामदान म्हणून जाहीर झाली होती. ग्रामदान मोहीम अशाच गावात झाली होती की, ज्या गावात मोठा जमीनदार कोणीच नव्हता किंवा ज्या गावातील लोकांकडे जमीन मालकीमध्ये फार मोठी विषमता नव्हती. 'भूदान' वरील टीकाकार असे म्हणतात की, विनोबाजींनी ग्रामदानासाठी मोठा जमीनदार नसलेली गावे किंवा आदिवासींची वनजमीन निवडली होती. १९६० च्या दशकात प्रारंभी भूदान चळवळीत जो जीव होता तो अखेरीस ओसरला. पुढे ही चळवळ नावालाच चालू होती. पुढे ती पूर्णत: थंडावली, कारण भूदानामध्ये मिळालेल्या जमिनीपैकी निम्म्याहून जास्त जमीन शासनाकडून वाटप होऊ शकली नाही. शेवटी बिहार सरकारने जून, १९९९ मध्ये 'राज्य भूदान समिती'च विसर्जित केली.

भूदान चळवळीचे योग्य मूल्यमापन झालेच नाही, असे काही जमीन मालकी सुधारणा विषयातील तज्ज्ञांना वाटते. 'भूदान' ही कल्पनाच मुळात स्वप्नवत वाटणारी आहे. जमिनीचा एखादा छोटासा तुकडादेखील कोणी शेतकरी सोडायला तयार होत नाही किंवा जमिनीचा बांध देखील शेजारचा शेतकरी बळकावू पाहतो त्याचा खून करण्यास शेतमालक प्रवृत्त होतो, तेथे कोणी संत जमीन दान मागण्यासाठी आला तर त्यास जमीन सहजी देईल असे संभवत नाही. अर्थात, महात्मा गांधीजींच्या 'सत्याग्रह, अहिंसा, सत्य' या विचारावर टीका करणाराच जमीन दानाच्या संकल्पनेवर टीका करतो.

भूदान चळवळीचे काही गुण खरोखरीच विचार करण्याजोगे आहेत. विशेषत:

स्वातंत्र्योत्तर काळात जमीनविषयक सुधारणासंबंधी जे प्रामाणिक प्रयत्न झाले, त्यात शासकीय कायद्यापेक्षा जमीनधारकाच्या प्रामाणिकपणास व सद्सद्विवेकबुद्धीस आवाहन करूनच जमीन मालकीविषयक सुधारणा होऊ शकतात. भूदान चळवळीने हे कार्य काही अंशी सुकर केले आहे.

भूदान संकल्पनेवर 'विश्वस्त' संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. कोणीही छोटा व बडा जमीनदार असो, तो जमिनीचा मालक नसतो, तो त्या जमिनीचा 'विश्वस्त' असतो. विनोबाजींनी 'सब भूमी है गोपाल की' हे सर्व जमीनदारांना आवाहन केले होते. 'विश्वस्ता'ची भूमिका जमीनधारकाच्या मनात जागवली तर जमीनविषयक सुधारणा आणि वाटप सोपे होईल. १९६१ साली तमिळनाडूतील सर्वोदय कार्यकर्त्यांनी जे जमीनदार भूदान चळवळीस किंवा जमीन दानास विरोध करतील, त्यांच्या विरुद्ध सत्याग्रह करायचे ठरविले होते. काही समाजवादी नेत्यांनीही 'विश्वस्त' ही भूमिका उचलून धरली होती आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी स्वीकारलेला 'सविनय कायदेभंग' या मार्गाचा अवलंब करण्याचा विचार केला होता; परंतु प्रत्यक्षात तो अमलात आणला गेला नाही.

'भूदान' संकल्पनेच्या मागे नैतिकतेचा दबाव जमीनदारावर आणून त्यास जमिनीचे वाटप करण्यास प्रवृत्त करणे ही जी भूमिका आहे ही नि:संशय महत्त्वाची आहे. विनोबाजींची 'भूदान चळवळ' निमाली असली तरी त्यातील 'नैतिकतेचे बळ' अमर आहे. शेतकऱ्यांनी अशा 'विश्वस्त' व 'भूदान' या दोन्ही संकल्पनेचा योग्य समन्वय साधल्यास शेतकरी चळवळ यशस्वी होण्यास हातभार लागेल.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. हिंदुस्थानात कायमधारा पद्धती ....... यांनी सुरू केली.

*(अ) वॉरन हेस्टिंग्ज* *(ब) रॉबर्ट क्लाईव्ह*

*(क) लॉर्ड कॉर्नवॉलीस* *(ड) लॉर्ड वेलस्ली*

२. काँग्रेसने कृषीविषयक सुधारणा सुचविण्यासाठी ..... समिती नियुक्ती केली होती.

*(अ) गोविंद वल्लभपंत* *(ब) जे. सी. कुमारप्पा*

*(क) दार* *(ड) वल्लभभाई पटेल*

३. जमीन स्वत: कसणारा, जमिनीवर नातलगाकरवी देखरेख करणारा, मशागतीसाठी भांडवल वा कर्जपुरवठा करणारा यास ..... म्हणतात.

*(अ) मजुराकरवी शेती* *(ब) भांडवली शेती*

*(क) कूळ शेती* *(ड) वैयक्तिक शेती*

४. 'तृष्णा हे सर्व दु:खाचे मूळ आहे' हा विचार .... यांचा होता.

*(अ) कौटिल्य* *(ब) विनोबा*

*(क) गौतम बुद्ध* *(ड) जयप्रकाश नारायण*

५. भूदान चळवळीचा प्रारंभ ..... येथून झाला.

*(अ) त्रिचनापल्ली (ब) पोचमपल्ली (क) कानपूर (ड) तिरुनवेल्ली*

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) कूळ संरक्षक कायदा (ब) भूदान चळवळीचे महत्त्व

(क) कायमधारा पद्धती (ड) ऋषी शेती.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. स्वातंत्र्यपूर्व काळात जमीन मालकीची पद्धती कशी होती? व त्यात ब्रिटिशांनी कोणत्या सुधारणा केल्या?

२. कमाल जमीनधारणा कायद्याचे परिणाम स्पष्ट करा.

३. भूदान चळवळीची कल्पना स्पष्ट करून ही संकल्पना कशी कार्यान्वित झाली?

४. कूळ संरक्षक कायद्याची वैशिष्ट्ये सांगून त्या कायद्याच्या मर्यादा स्पष्ट करा.

५. स्वातंत्र्यानंतर झालेल्या जमीन सुधारणांचे परिणाम सांगा.

❖❖❖

प्रकरण ८

# हरित क्रांती

(Green Revolution)

## पार्श्वभूमी

स्वातंत्र्यपूर्व काळात भारत कृषीप्रधान देश असला तरी, शेतीकडे इंग्रजांनी कायम दुर्लक्ष केले होते. शेतीचे उत्पादन वाढविणे किंवा किमान अपेक्षित धान्योत्पादन व्हावे यासाठी राज्यकर्त्यांनी फार काही केले नाही. त्याचा परिणाम शेतीवर अवलंबून असणारी हजारो कुटुंबे कायम दारिद्र्यात पिचत राहिली. त्यातच भारतात वारंवार येणारा दुष्काळ भारतीय जनतेच्या पाचवीला पूजला होता. याचा परिणाम शेतकऱ्यांवर कर्जबाजारीपणा, सावकारांची दंडेली, जमिनीची मालकी हिसकावून घेणे, अज्ञानापोटी होणारी गरीब शेतकऱ्यांची पिळवणूक व फसवणूक अशा गोष्टी सर्रास घडत होत्या. स्वातंत्र्यलढा जोरात चालू होता, शेतकऱ्यांच्या अशा दीन परिस्थितीकडे इंग्रज राज्यकर्ते लक्ष देणे शक्य नव्हते आणि स्वातंत्र्यलढ्यात गुंतलेल्या राजकीय नेत्यांच्या दृष्टीने शेतकऱ्यांच्या किंवा सामान्य जनतेच्या दुःस्थितीपेक्षा इंग्रजांना 'चले जाव' म्हणून हाकलून देऊन राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करणे, यास त्यांचा अग्रक्रम होता.

१९४७ साली भारतास स्वातंत्र्यप्राप्ती झाली. लाक्षणिक अर्थाने भारतीय जनतेच्या हाती सत्ता आली आणि जनतेचे प्रतिनिधी असलेल्या नेत्यांनी भारतीय शासनव्यवस्था हाती घेतली. **पंडित जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले. त्यांच्यासमोर भारताच्या सर्वंकष विकासाच्या स्वप्नांची पूर्तता करण्याचे प्रचंड काम होते. त्यांपैकी आर्थिक विकास वेगाने घडवून आणणे, हे त्यांच्या दृष्टीने प्रथम उद्दिष्ट होते.** आर्थिक विकासात मुख्यतः उद्योग आणि कृषी या दोन घटकांचा विचार केला जातो. सोव्हिएट रशियाच्या पंचवार्षिक योजना व त्याद्वारे तेथे घडून आलेला औद्योगिक विकास याचा पंडित नेहरूंच्यावर मोठाच प्रभाव होता. तेच **'मॉडेल'** त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत आणले आणि औद्योगिक विकासास त्यांनी अग्रक्रम दिला, अर्थात, विकासाकडे त्यांनी अजिबात लक्ष पुरवले नाही, असे नाही. त्यांनी जमिनीच्या मालकीहक्कासंबंधी १९५१ साली पहिली घटनादुरुस्ती केली, इतकेच नव्हे तर त्यानंतर जमिनीविषयक अनेक सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक घटनादुरुस्त्या केल्या व अल्पभूधारक आणि जमीनदारांच्या जमिनी कसणारी कुळे यांना संरक्षण देणारे कायदे केले. **परंतु त्यांचा ओढा भारतात**

औद्योगिक क्रांती घडवून आणण्याकडे जास्त होता. त्यासाठी त्यांनी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारून खाजगी उद्योगाबरोबर राष्ट्रीय उद्योग उभारण्यावर भर दिला. विशेषतः ज्या क्षेत्रात खाजगी उद्योगपती फायदेशीर न चालणाऱ्या उद्योगात हात घालत नव्हते, असे उद्योग सरकारने चालू करावेत असे पंडित नेहरूंचे धोरण होते. म्हणूनच पहिल्या दोन-तीन पंचवार्षिक योजना मुख्यतः औद्योगिक विकासावर भर देणाऱ्या होत्या. या काळात अनेक अवजड उद्योग देशभर उभारले गेले, मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक झाली, हजारो कुशल-अकुशल कामगारांच्या हाताला काम मिळाले, शहराकडे कामगारांचा लोंढा येऊ लागला, छोट्या नगरांची महानगरे झाली आणि महानगराची अस्ताव्यस्त पसरलेली अफाट महानगरे झाली.

पंडित नेहरूंच्या काळात वेगाने झालेल्या या औद्योगिक विकासाचा पहिला फटका छोट्या-मोठ्या खेड्यांनी ओळखल्या जाणाऱ्या भारतातील खेड्यांना बसला. कारखान्यात लहान-सहान कामे करण्यासाठी खेड्यातील शेतमजूर, अल्पभूधारक आपली स्थानिक कामे सोडून, तुलनेने बरा मेहनताना मिळण्याच्या आशेने शहरांकडे ओढला गेला. खेडी ओस पडण्याची पाळी आली. उद्योगनगरी म्हणून प्रख्यात असलेल्या मुंबईकडे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यानजीक असलेल्या भागातून इतके लोक मुंबईला गेले की, काही गावात फक्त वृद्ध आणि स्त्रिया-मुलेच राहिली. भारतात जेथे-जेथे अवजड उद्योग उभारले गेले, तेथे-तेथे अशीच परिस्थिती राहिली.

पंडित नेहरूंनी ज्याप्रमाणे उद्योगांसाठी पायाभूत (Infrastructure) सोई पुरवल्या होत्या, त्याचप्रमाणे कृषीव्यवस्थेसाठी केवळ उत्पादन वृद्धी हे उद्दिष्ट न ठेवता, कृषी उत्पादन वृद्धी करण्यासाठी अनेक पायाभूत घटकांची उभारणीही त्यांनी केली होती. कृषीव्यवस्थेसाठी पूरक ठरतील अशा काही योजना त्यांनी राबवल्या. भाक्रा-नानगलसारखी सिंचन व विद्युत पुरवठा करणारी प्रचंड धरणे, कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन प्रयोगशाळा, रासायनिक खतांचे कारखाने इत्यादींची स्थापना पंडित नेहरूंनीच पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांच्या काळात केली होती. एखादा अवजड उद्योग म्हणजे आधुनिक भारताचे मंदिर असे समजले जाण्याच्या काळात धरणे, विद्युत केंद्रेदेखील अशीच **आधुनिक भारताची मंदिरे** (Temple of Modern India) होती. तरीही उद्योग उभारणीत जसे कामगार-मालक यांना प्रत्यक्ष आर्थिक फायदा होत होता तसे कृषीव्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने या क्षेत्रातील रासायनिक खतांचे कारखान्यांसारख्या आधुनिक मंदिरामुळे कृषिक्षेत्रात राबणाऱ्या शेतकऱ्यांना प्रत्यक्षात काडीचाही फायदा होत नव्हता. साहजिकच, शेतीसाठी पायाभूत उद्योग उभे राहिले, परंतु त्याचा लाभ फक्त मोठ्या जमीनदारांना आणि आधुनिक

तंत्रज्ञानावर आधारित शेती करू इच्छिणाऱ्या शिक्षित शेतकऱ्यांनाच झाला. असा लाभ घेणाऱ्यांची संख्या एकूण शेतकऱ्यांपैकी ५ टक्क्यांहून कमी होती. याच काळात पडीक जमीन लागवडीखाली आणण्याच्या शासकीय प्रयत्नामुळे १९६० च्या दशकाच्या अखेरपर्यंत बरीचशी पडीक, ओसाड जमीन लागवडीखाली आणली गेली, पण त्यालाही काही मर्यादा होत्या. सगळी जमीन लागवडीखाली आणूनही म्हणावे तितके अन्नधान्याचे उत्पादन झाले नाही. हे वास्तव लक्षात येताच पंडित नेहरूंनी शेती उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा पाठपुरावा केला आणि शेतीसाठी ट्रॅक्टर, रासायनिक खते, पाटबंधारे याकडे त्यांनी लक्ष वळवले. परंतु हे आधुनिक तंत्रज्ञान एका रात्रीत आणता येत नाही, त्यास ट्रॅक्टर, रासायनिक खते यांच्या निर्मितीसाठी पाच-दहा वर्षांचा काळ अपेक्षित असतो. पाटबंधारे कालव्यासाठी धरणे बांधणे ही सोपी गोष्ट नव्हती. तरीही पंडित नेहरूंनी शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान निर्मितीसाठी तसे उद्योग वा धरणे बांधण्यासाठी योग्य नद्यांचे स्रोत यासाठी प्रयत्न सुरू केले. या पंडित नेहरूंच्या प्रयत्नांचे फळ त्यांना पाहता आले नाही, कारण १९६४ साली त्यांचा मृत्यू झाला. यासंबंधी भाष्य करताना प्रसिद्ध 'हरित क्रांती' तज्ज्ञ जी. एस. भल्ला म्हणतात, "The qualitative technological transformation in India - the Green Revolution - came about not during Pt. Nehrus lifetime but soon after his death. But the foundation for the technological development were laid during Nehru's time". पुढील काळात उदयास आलेल्या हरित क्रांतीसाठी जे गुणवत्तापूर्ण तांत्रिक परिवर्तन घडून आले, त्याचा पाया पंडित नेहरूंनीच घातला होता, याचे विस्मरण होऊ देता कामा नये.

## हरित क्रांती : संकल्पना व अर्थ

'हरित क्रांती' या शब्दयोजनेतील 'हरित' हा शब्द अर्थातच 'हिरव्या' रंगाशी निगडित आहे. निसर्गातील पानाफुलांचा रंग हिरवा असतो, म्हणून 'हरित' शिवाय हिरवा रंग विकास, प्रगती व शांतता या अर्थाशीही दुरन्वयाने असला तरी संबंधित असतो. इथे तर शेती आणि निसर्ग निसर्ग व हिरवा एकमेकांशी इतके एकरूप आहेत की, निसर्गावर आधारलेली शेती हिरवीच असणार अशी खात्री होते. म्हणून शेतीच्या कृषिक्षेत्राच्या विकासाची प्रगती दर्शविणारे वेगवान बदल 'हरित क्रांती' या शब्दयोजनेत योग्यरित्या प्रकट होतात.

## अभूतपूर्व अन्नधान्य टंचाई हरित क्रांतीस उद्युक्त

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारने शेतीकडे कमालीचे दुर्लक्ष केले होते. विशेषतः स्वातंत्र्यलढ्याच्या अखेरच्या पर्वात, ब्रिटिशांनी आपली सत्ता टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात

भारतीय जनतेवर हरएक प्रकारे दंडेलीने कारभार चालू ठेवला होता, त्यातच दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांना गट्टी राष्ट्रांशी (Axis powers-Germany - Italy - Japan) निकराचा लढा द्यावा लागला. हिंदुस्थानचे लष्कर ब्रिटिशांसाठी लढत होते आणि हिंदुस्थानची सर्व साधनसंपत्ती ब्रिटिशांनी या युद्धासाठी वापरात आणली होती. भारत अगदी कंगाल होण्याच्या स्थितीत आला होता. शेवटी ब्रिटिश सत्ता घायकुतीला आली आणि स्वातंत्र्यलढ्याच्या तीव्रतेमुळे त्यांना भारताला स्वातंत्र्य बहाल करावे लागले. अशा परिस्थितीत स्वतंत्र भारताला राजकीय, सामाजिक, कृषी, विज्ञान, उद्योग इत्यादी सर्व क्षेत्रांत पहिल्यापासून तयारी करावी लागली.

पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारतीय नेत्यांनी, प्रशासनाने आणि जनतेनेही उत्साहाने नवा भारत उभारण्याच्या उद्योगास प्रारंभ केला. पण या प्रयत्नास काही मर्यादा होत्या.

**'हरित क्रांती' ची संकल्पना अमेरिकेतून १९४० च्या दशकात पुढे आली. अमेरिकन शास्त्रज्ञ नॉर्मन बोरलॉग** (Norman Borlaug) **यांनी गव्हाची एक अशी जात शोधून काढली की, त्यावर हवामानाचा परिणाम होत नव्हता आणि त्या जातीच्या रोपाला भरपूर दाणे असलेली लांब लोंब्री येत होती.** तसेच ही जात गव्हाचे खूप उत्पादन देणारी होती. गव्हाचा हा वाण त्यांनी मेक्सिकोत पेरला आणि तेथे गव्हाचे उत्पादन तिपटीने वाढले, त्यामुळे मेक्सिकन लोकांसाठी पुरून उरेल इतके गव्हाचे उत्पादन वाढून मेक्सिकोने गव्हाची निर्यातही सुरू केली. हाच वाण बोरलॉग यांनी अन्य देशांनाही पुरवला व त्या-त्या देशांचे गव्हाचे उत्पादन अनेक पटीने वाढले. बोरलॉग यांच्या या क्रांतिकारक कार्यासाठी त्यांना **'शांततेचे नोबेल प्राईझ'** (Nobel Peace Prize) मिळाले. गव्हाच्या या जास्त उत्पादन देणाऱ्या जातीचा विकसित व विकसनशील देशात प्रसार झाला, त्यामुळे विकसनशील देशातील गरीब जनता उपासमारीपासून वाचली. **या महान कार्यामुळे नॉर्मन बोरलॉग यांना 'हरित क्रांतीचे जनक' (Father of Green Revolution) असे म्हटले जाते.**

भारतात शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याच्या दृष्टीने **डॉ. एन. एस. स्वामिनाथन** यांनी प्रथम संशोधनास प्रारंभ केला. नॉर्मन बोरलॉग यांनी गव्हाच्या ज्या जातीचा प्रयोग मेक्सिकोत केला. ती मेक्सिकन जात भारतात आणली व येथील जमिनीस पोषक असे संशोधन करून, भारतीय हवामान व जमीन यास पोषक असा गव्हाचा वाण तयार केला. त्याचबरोबर त्यांनी तांदूळ, कडधान्ये इत्यादी धान्याच्या वाढीव उत्पादनासाठी संशोधन केले व त्याही संकरित जातीपासून धान्योत्पादनात बऱ्यांपैकी वाढ घडवून आणली. म्हणून **डॉ. एन. एस. स्वामिनाथन यांना 'भारतीय हरित क्रांतीचे जनक'** असे म्हटले जाते. कृषिक्षेत्रात धान्याचे भरीव उत्पादन देणाऱ्या या हरित क्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी झाला.

विशेषतः कृषिक्षेत्रात कोणतेही नवीन तंत्रज्ञान वा रासायनिक खते यांचा अन्नधान्य उत्पादनासाठी उपयोग केला जात नव्हता. पारंपरिक पद्धतीने शेती केली जात असल्यामुळे धान्योत्पादनात वाढ होत नव्हती. याच वेळी लोकसंख्येत वृद्धी होत असल्यामुळे खाणारी तोंडे वाढली पण जमिनीतून धान्याचे उत्पादन न वाढता, पूर्वीचेच कायम राहिले. **स्वातंत्र्यानंतर १९४९ पासून १९६० च्या दरम्यान अन्नधान्याची टंचाई जाणवू लागली.** १९६० च्या दशकात अन्नधान्याची टंचाई इतकी तीव्र झाली की, धान्याचे स्थानिक बाजारपेठेतील भाव कमालीचे वाढले. अशा परिस्थितीत धान्याचे भाव सर्वसामान्य जनतेला परवडतील असे राहण्यासाठी परदेशातून धान्य आयात करण्याशिवाय सरकारसमोर अन्य पर्यायच राहिला नाही. त्याचबरोबर ज्या धान्य उत्पादकांकडे गरजेपेक्षा जास्त धान्याचा साठा असेल, त्यांच्याकडून सक्तीने अतिरिक्त धान्य वसुली करण्याचा मार्ग सरकारने अवलंबावयाचे ठरविले. अशी उपाययोजना रशिया व चीनने केली होती, पण त्यांचा मार्ग लोकशाही पद्धतीशी विसंगत होता. साहजिकच, सरकारसमोर परदेशातून धान्य आयात केल्याशिवाय कोणताच मार्ग राहिला नव्हता. **अशा अभूतपूर्व अन्नधान्य टंचाईवर मात करण्यासाठी भारताने अतिरिक्त धान्यसाठा असलेल्या अमेरिकेशी 'पी.एल.-४८०' योजनेखाली धान्य आयात करण्याचा १९५६ साली करार केला होता.** (Public Law 480 - P.L. 480 - Food for Peace -) **शांततेसाठी अन्नधान्य** हा कायदा १० जुलै, १९५४ रोजी तत्कालीन अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी 'कृषीविषयक व्यापार' विकासास साहाय्यक कायदा म्हणून मंजूर केला होता. त्यानंतर जॉन केनेडी यांनी १९६१ साली या कायद्यास **'शांततेसाठी अन्नधान्य'** असे नाव दिले. त्यानुसार विकसनशील देशांना अन्नधान्याची मदत देण्याचे ठरविण्यात आले होते. अशा पी. एल.-४८० योजनेखाली पहिल्याच वर्षी ३० लाख टन अन्नधान्याची आयात अमेरिकेतून भारतात झाली आणि ही आयात पुढील काळात सातत्याने वाढतीच राहिली. १९६३ साली ही आयात ४५ लाख टनांपर्यंत पोचली. देशांतर्गत धान्याचे भाव प्रतिवर्षी २० टक्क्यांवर गेले. त्यामुळे १९६६ साली भारताला १०० लाख टन धान्य आयात करण्याची पाळी आली. या वर्षी बिहार, उत्तर प्रदेश या राज्यांत दुष्काळाने कहर केला. १९६५ च्या भारत-पाक युद्धात पाकविरुद्ध भारताने आघाडी घेतली होती. पाकिस्तानच्या पाठीशी असलेल्या अमेरिकेला हे आवडले नाही आणि याच दरम्यान अमेरिकेने व्हिएटनामशी चालू असलेल्या संघर्षात भारताने व्हिएटनामला पाठिंबा देण्याचे धोरण अवलंबिले होते. या दोन घटनांमुळे अमेरिकेचा भारतावर राग होता. देशांतर्गत भारत अन्नधान्याच्या टंचाईमुळे बिकट प्रसंगात सापडला होता. ही टंचाई दूर करण्यासाठी

आतापर्यंत भारताला अमेरिकेकडून धान्याची आयात होत होती. **पुन्हा जेव्हा भारताकडून धान्य आयातीची मागणी झाली तेव्हा अमेरिकेने भारताला धान्य देण्याच्या मोबदल्यात आपले भारत–पाक व व्हिएटनाम युद्धप्रसंगी घेतलेल्या धोरणात माघार घेण्यासाठी दडपण आणण्याचा प्रयत्न केला.** भारत देशांतर्गत अन्नधान्य टंचाई आणि परराष्ट्र धोरणातील माघार अशा कोंडीत सापडला. भारताला नाइलाजाने अमेरिकेसमोर नरमाईचे धोरण पत्करावे लागले.

**नवे कृषीविषयक धोरण व हरित क्रांतीची नांदी**

तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, अन्नधान्य मंत्री सी. सुब्रह्मण्यम आणि इंदिरा गांधी यांनी कृषिक्षेत्राच्या विकासासाठी नव्या कृषीविषयक धोरणाचा गांभीर्याने विचार सुरू केला. लालबहादूर शास्त्रीनंतर सत्तेवर आलेल्या इंदिरा गांधींना भारतातील कृषिक्षेत्राच्या विकासासाठी जागतिक बँकेनेही पाठिंबा दिला. अमेरिकेनेही आपल्या भारतविषयक धोरणाचा फेरविचार करून भारताच्या कृषीविषयक धोरणाला फारसा विरोध न करण्याचे ठरविले. नव्या कृषीविषयक धोरणात, भारतीय जमीन व हवामानात भरपूर उत्पादन देणारे मेक्सिकन बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशके, ट्रॅक्टरसारखी यांत्रिक अवजारे, पाणी खेचणारे पंप याचबरोबर मातीचा कस तपासणारी यंत्रे, कृषीविषयक शिक्षण देणारा कार्यक्रम व शेतीसाठी कर्जधोरण इत्यादींचा समावेश करण्यात आला. यासाठी भारतातील एकूण शेतीखाली असलेल्या जमिनीपैकी १० टक्के जमीन सुमारे ३ कोटी २० लाख एकर जमीन नव्या कृषीविषयक प्रयोगासाठी निवडण्यात आली. १९६८ ते १९७३ या काळात शासनाने शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. १९६५ सालीच 'कृषीउत्पादनाचे दर निश्चिती मंडळ' (Agricultural Price Commission) स्थापन करण्यात आले होते. त्याद्वारे शेतकऱ्याला आपल्या उत्पादित मालाची हमी किंमत देण्यात आली. अशा प्रकारे शासकीय भांडवली गुंतवणूक, संस्थात्मक कर्जपुरवठा, हमी भाव व माफक किमतीत नवी यांत्रिक अवजारे इत्यादींमुळे शेती उत्पादनात वेगाने वाढ झाली. एकंदरीत हरित क्रांतीपूर्व काळात १९७० च्या दशकात २५ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आली. १९६०–६१ ते १९७०–७१ या दहा वर्षांच्या काळात डिझेल व विद्युत पंपांची संख्या ४ लाख २१ हजारांवरून २४ लाखांवर पोचली व विंधन विहिरींची संख्या ९० हजारांवरून ४ लाख ६० हजारांवर तर ट्रॅक्टरची संख्या ३१ हजारांवरून १ लाख ४० हजारांवर गेली. रासायनिक खते ३ लाख ६ हजार मेट्रिक टनांवरून २३ लाख ५० हजारांवर मेट्रिक टनांपर्यंत वापरात आली. कृषिक्षेत्रात अशा विविध उपाययोजनांमुळे हरित क्रांतीचा प्रभाव दृष्टोत्पतीस येऊ लागला.

## हरित क्रांती (Green Revolution)

डॉ. गुलाटी आणि डॉ. फॅन यांच्यासारखे कृषितज्ज्ञ हरित क्रांतीची तीन कालखंडात, पहिला कालखंड १९६६ ते १९७२, दुसरा कालखंड १९७३ ते १९८० आणि तिसरा कालखंड १९८१ ते १९९० अशी विभागणी करतात.

१९६६ ते १९७२ या पहिल्या कालखंडात भारताला पी.एल.-४८० या करारानुसार अमेरिकेतून येणाऱ्या धान्य आयातीवर अवलंबून राहावे लागू नये, **तत्कालीन कृषिमंत्री सी. सुब्रह्मण्यम यांनी धान्योत्पादनास चालना मिळावी,** त्याचप्रमाणे शेतमालाला योग्य किंमत मिळावी यासाठी नवे कृषीविषयक धोरण जाहीर केले. त्यानुसार **'भारतीय अन्न महामंडळ'** (Food Corporation of India) व **'कृषी उत्पादनांची किंमत निश्चिती आयोग'** (Agricultural Price Commission) यांची स्थापना करण्यात आली. याच वेळी भरघोस उत्पादन देणाऱ्या गहू व मका यांच्या बियाणांचे वाण (High yielding Variety - HYV) मेक्सिकोतून मागविण्याचे धाडसी पाऊल कृषिमंत्र्यांनी उचलले. या बियांमुळे कृषी उत्पादनात आश्चर्यकारक वाढ झाली. त्यासाठी बियाणांच्या बरोबरीने रासायनिक खते, यांत्रिक अवजारे, पाटबंधारे कालव्याच्या सोई आणि कृषितज्ज्ञांचे मार्गदर्शन यामुळे १९६६ ते १९७२ या पहिल्या कालखंडात अन्नधान्याचे उत्पादन ७ कोटी ४० लाख मेट्रिक टनांवरून १० कोटी ५० लाख मेट्रिक टनांवर पोचले आणि १९७१-७२ मध्ये भारत अन्नधान्याच्याबाबतीत स्वावलंबी झाला. याच वेळी दारिद्र्य दूर करण्यासाठीही चौथ्या पंचवार्षिक योजनेत योग्य अशी तरतूद करण्यात आली. त्यामुळे १९६७ साली ६४.८ टक्के लोक दरिद्री होते, ती संख्या १९७३ साली ५६ टक्क्यांवर आली.

**१९७३ ते १९८०** या दुसऱ्या कालखंडात, पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९६९ साली बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर काही महत्त्वाची आर्थिक क्षेत्रे सरकारच्या ताब्यात घेण्याचे ठरविले, पण त्यास बड्या खाजगी व्यापाऱ्यांनी कडवा विरोध केला. त्यास न जुमानता सरकारने १९७३-७४ साली गव्हाचा ठोक व्यापार हाती घेतला पण शासकीय दिरंगाई व ढिलेपणा यामुळे हा व्यवहार नुकसानीत येण्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यातच काही राज्यांतील १९७२-७३ च्या भयानक दुष्काळ शासकीय योजनांना शापच ठरला. त्यावर्षी अन्नधान्याचे उत्पादन ७.७ टक्क्यांनी घटले. परिणामी, अमेरिकेतून पुन्हा ४० लाख मेट्रिक टन धान्य आयात करण्याची पाळी आली. अशा गंभीर परिस्थितीतूनही शासनाने धान्योत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना रासायनिक खतासाठी सूट (subsidy) देऊन धान्याच्या हमी किमतीचा आधार दिला. दुष्काळी परिस्थितीत विंधन विहिरी खोदण्यासाठीही शासनाने बरीच मदत दिली. अशा प्रयत्नांमुळे भरघोस उत्पादन देणाऱ्या धान्यजातीचे वाण, विंधन विहिरी खोदण्यास प्रोत्साहन इत्यादी उपाययोजना

चांगल्याच फलद्रूप झाल्या. १९७२-७३ ते १९७९-८० या काळात सुमारे ३.१ टक्क्यापर्यंत धान्योत्पादन वाढले. परिणामस्वरूप दारिद्र्यरेषाही ५६ टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर आली.

**१९८१ ते १९९०** या तिसऱ्या कालखंडात भारताने धान्योत्पादनाबाबत पूर्णांशाने स्वावलंबन मिळवले. १९६४ साली भाताचे उत्पादन ३ कोटी ७० लाख मेट्रिक टन होते ते १९८६ साली ६ कोटी ३८ लाखांपर्यंत गेले. गव्हाचे उत्पादन १ कोटी २० लाख होते ते ४ कोटी ७० लाखांवर गेले. अशा वाढीव उत्पादनामुळे भारताने प्रथमच २ कोटी ५४ लाख धान्याचा शिलकी साठा केला. विशेषत: १९८७ साली पडलेल्या भयंकर दुष्काळातही शिलकी धान्याचा उपयोग करून एकही भूकबळी होऊ दिला नाही. हे यश केवळ हरित क्रांतीचे होते. **हरित क्रांतीचे यापुढील पाऊल म्हणजे ग्राहकांना माफक किमतीत धान्य देण्याची तरतूद केली. धान्यबाजारात धान्याच्या किमतीतील चढ-उतारापासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आले आणि आयात धान्य पूर्णत: थांबवून परकीय चलनाची मोठीच बचत करण्यात आली.**

**हरित क्रांतीचे परिणाम :**

१९६० च्या दशकात सुरू झालेल्या हरित क्रांतीमुळे १९६७-६८ ते १९७०-७१ या काळात धान्योत्पादन ३५ टक्क्यांनी वाढले आणि धान्य आयात १० कोटी ३० लाख टनांवरून ३ कोटी ६० लाख टनांपर्यंत खाली आली. १९७७ नंतर दरवर्षी धान्य उत्पादन वाढते राहिले आणि १९८४ पर्यंत भारताने धान्याची आयात पूर्णत: बंद केली. आतापर्यंत भारत एखाद्या भिक्षेकऱ्याप्रमाणे **'भिक्षेचा कटोरा'** (Begging bowl) घेऊन देशोदेशी फिरणारा देश अशी भारताची प्रतिमा निर्माण झाली होती, ती प्रतिमा पुसून टाकली. भारताची लोकसंख्या वाढीचा दर २.१ टक्के असूनही या वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्य संहजपणे पुरवण्याइतकी क्षमता हरित क्रांतीने निर्माण केली.

**धान्योत्पादनात वृद्धी :** सरकारच्या ज्या नव्या कृषीविषयक धोरणामुळे हरित क्रांती शक्य झाली, त्या धोरणामुळेच धान्योत्पादन सातत्याने वाढते राहिले. विशेषत: या काळात लोकसंख्या वाढतच होती तरीही वाढत्या लोकसंख्येपेक्षा धान्योत्पादनाची वाढ तुलनेने जास्त होती. हरित क्रांतीचा हा मोठाच फायदा होता.

**शेतकरी :** हरित क्रांती शेतकरी आणि शेती यांच्याशी संबंधित होती. हरित क्रांतीमुळे शेतकऱ्यांचे शेतीमाल उत्पादन वाढले, त्यांचा जीवनमानविषयक दर्जा उंचावला. त्यांचा जीवनविषयक संघर्ष कमी झाला, त्याची मानसिकताही बदलली आणि भारतीय नागरिक म्हणून त्यास आपल्या हक्कांची व जबाबदाऱ्यांची जाणीव झाली. या जाणिवेतून त्याने ग्रामीण भागात दळणवळणाच्या साधनांचा विस्तार करून घेतला. अतिरिक्त उत्पादनांमुळे त्याला दीर्घकालीन शेतीत सुधारणा करण्यास वाव मिळाला.

**कृषी विद्यापीठे :** ज्या कृषी विद्यापीठामुळे हरित क्रांती होण्यास तांत्रिक सहकार्य व मार्गदर्शन मिळाले, त्या कृषी विद्यापीठांवरील जबाबदारी वाढली. कृषी विद्यापीठांनी नवनवीन कृषी संशोधनाला शिक्षण विस्तार सेवा कार्यक्रमाच्या माध्यमातून चालना दिली. परिणामी, भारतीय शेतीच्या विकासास नवीन प्रेरणा मिळाली. कृषी विद्यापीठांनी गहू, तांदूळ, तेलबिया अशा काही निवडक पिकांच्या उत्पादनास कृषी विद्यापीठांनी मार्गदर्शन केल्यामुळे त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे हरित क्रांती यशस्वी होण्यास मदत झाली. सर्वसामान्य जनतेचे कृषी विद्यापीठांकडे लक्ष गेले. विशेषत: शेतकऱ्यांच्या मुलांचा कृषी विद्यापीठात शिक्षण घेण्याकडे कल निर्माण झाला. देशात कृषी विद्यापीठांची संख्याही वाढली. या वाढलेल्या कृषी विद्यापीठांमुळे हरित क्रांतीमुळे जे लाभ झाले होते ते टिकवण्यासाठी व त्यात सातत्य राखण्यासाठी विद्यापीठांनी मोठाच हातभार लावला.

**हरित क्रांतीचे तोटे**

१. हरित क्रांतीचे फायदे सर्वसामान्य **शेतकऱ्यांना न होता, ते मोठे श्रीमंत जमीनदार अशा विशिष्ट** वर्गांनाच झाले. शेतमजूर व अल्पभूधारक हरित क्रांतीच्या लाभापासून वंचित राहिले. त्यांच्यात बेरोजगारीची अवस्था निर्माण झाली.

२. हरित क्रांतीमुळे धान्योत्पादन वाढले परंतु **अन्नधान्य दर्जा मात्र खालावला.** विशेषत: रासायनिक खताच्या सततच्या वापरामुळे जमिनीचा कस कमी होण्याचा धोका उद्भवला शिवाय भारतीय जमिनीला पोषक न ठरणारे काही धान्यांचे परदेशी वाण वापरल्यामुळे धान्यांची प्रत खालावली. शिवाय अन्नधान्याचे मोठ्या प्रमाणावर जे उत्पादन झाले, त्यासाठी साठवणुकीची पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे काही प्रमाणात धान्यांची नासाडी झाली.

३. अनेक शेतकऱ्यांकडे पाण्याची सोय नसल्यामुळे एकापेक्षा जास्त पिके घेता येत नव्हती. केवळ **पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शेतीस हरित क्रांतीचा फारसा लाभ झाला नाही.**

४. हरित क्रांतीचे फायदे मोठ्या शेतकऱ्यांना व तेही बागायती शेतकऱ्यांनाच झाले, विशेषत: ज्या भागात कमी पाऊस पडतो किंवा पाटबंधारे, कालवे ज्या भागात नाहीत, त्या भागातील शेतकरी गाजावाजा करीत आलेल्या हरित क्रांतीपासून वंचित राहिले. त्यामुळे प्रादेशिक विषमता निर्माण झाली. अशा **विषमतेमुळे ग्रामीण जीवनात द्वेष-मत्सराचे वातावरण निर्माण झाले. त्याचा परिणाम एकूण समाजस्वास्थ बिघडण्यात झाला.** तसेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्नही यातून निर्माण झाला.

## हरित क्रांतीच्या मर्यादा / दोष

अन्नधान्य टंचाईच्या प्रचंड संकटापासून वाचण्यासाठी धान्याची आयात करावी लागल्यामुळे परकीय चलनाच्या तुटवड्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण आला. काही प्रमाणात अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्रांचा मिंधेपणा पत्करण्याची पाळी आली. अशा संकटापासून हरित क्रांतीने देशाला वाचवले परंतु त्यामुळे सर्वच काही साधले असे झाले नाही. कारण हरित क्रांतीच्या काही अंगभूत मर्यादा होत्या.

**बेरोजगारीत वाद :** हरित क्रांतीमुळे उत्पादन प्रक्रियेत नवीन तांत्रिक ज्ञान, यंत्रसामग्री, पाणीपुरवठ्याच्या सोई, जास्त उत्पादन देणारी सुधारित वाणाची जात यामुळे शेतीचा जलद विकास झाला. हे खरे असले तरी शेतीवर काम करणाऱ्या घटकांना रोजगार उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण झाल्या. यांत्रिक साधनांचा वापर झाल्यामुळे शेतमजूर बेरोजगार झाले. या बेरोजगारीस हरित क्रांतीसच जबाबदार धरले जाते.

**निर्यातविषयक समस्या :** हरित क्रांतीमुळे धान्योत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. ती इतकी होती की, देशांतर्गत गरज पूर्ण होऊन अतिरिक्त उत्पादन झाले. या अतिरिक्त उत्पादनासाठी साठवणुकीची व्यवस्था नसल्यामुळे निर्यात करण्याशिवाय अन्य पर्याय नव्हता. पण प्रगत देशामध्येही अन्नधान्याचे साठे विपुल प्रमाणात असल्याचे व त्यांनी निर्यात केलेल्या धान्याची किंमत कमी असल्यामुळे भारतातील अतिरिक्त धान्यास मागणीच नव्हती. त्यामुळे निर्यात समस्या अवघड झाली होती.

**रासायनिक खतांचे दुष्परिणाम :** भारतीय शेती बव्हंशी निसर्गावर अवलंबून आहे. हरित क्रांतीमुळे पाणीपुरवठ्याच्या सोई वाढल्याने खरीप पिकांबरोबर रब्बी पिकेही मोठ्या प्रमाणावर घेण्यात आली. त्यासाठी अर्थातच रासायनिक खतांचा बेसुमार वापर करण्यात आला. शेतजमिनीला कोणत्याही खतांची मात्रा विशिष्ट मर्यादेपर्यंतच द्यावी लागते. परंतु रासायनिक खतांचा बेसुमार वापर जमिनीचा कस कमी करण्यात झाला व खते कितीही वापरली गेली तरी उत्पादनात वाढ न होता ते कमीच होऊ लागले.

**नि:सत्त्व अन्नधान्याची निर्मिती :** अधिक धान्योत्पादनासाठी नवीन संकरित बी-बियाणांचा शोध घेण्यात आला. अशा बियाणांपासून प्राप्त होणारे अन्नधान्य सात्त्विक व पौष्टिक समजले जात नाही. त्याची गुणवत्ता कमी दर्जाची असते व ते नि:सत्त्वही असते. असे अन्नधान्य वापरात आल्यामुळे मानवी शरीरावर आरोग्यदायी परिणाम दिसून आला नाही. हरित क्रांतीच्या धान्योत्पादनामुळे व एकूणच निस:त्त्व अन्नधान्याच्या वापरामुळे रोगराईची शक्यता वाढल्याचे दिसून आले आहे. म्हणूनच बाजारात बऱ्याच वेळा ग्राहक देशी वाणाच्या उत्पादनाची मागणी करू लागला.

**शेतजमिनीतील स्थायी सुधारणांकडे दुर्लक्ष :** हरित क्रांतीमुळे शेतकरी उत्पादन

वृद्धीसाठी कमीतकमी वेळात जास्तीतजास्त उत्पादन देणाऱ्या पिकांची लागवड करतो. त्यामुळे उत्तम बियाणे, सेंद्रिय खते वापरून जमिनीचा पोत सुधारणे, अशा सारख्या स्थायी स्वरूपाच्या सुधारणा करणे या उपायांचा अवलंब करण्याचा शेतकरी टाळतो. परिणामी वारंवार संकरित बियाणे व रासायनिक खते यांचा सतत वापर झाल्याने निसर्गदत्त सकस जमीन हलकी व निसःत्त्व होत जाईल, पर्यायाने ही राष्ट्रीय हानी ठरेल आणि त्याचा फटका भावी पिढीला बसण्याची शक्यता असते, याचे विस्मरण होऊ देता कामा नये.

## हरित क्रांतीचे महत्त्व

भारतासारख्या खंडप्राय देशात गेली अनेक शतके दुष्काळ, अवर्षण, साथीचे रोग, दारिद्र्य, उपासमार, अन्नधान्याची सतत टंचाई या नैसर्गिक संकटांनी धुमाकूळ घातला होता. पाच-दहा वर्षांच्या अंतराने दुष्काळ आणि साथीचे रोग भारताच्या पाचवीला पूजले होते. अशा नैसर्गिक संकटांवर मात करता येते यावर कोणा राज्यकर्त्यांनी विचार सुद्धा केला नव्हता, कारण हा दैवी कोप आहे असे समजून त्यास तोंड देणे क्रमप्राप्त आहे, असाच भारतीय राज्यकर्त्यांचा आणि जनतेचा समज होता. विशेषतः दुष्काळ पडणे आणि त्यात हजारो लोकांचा भूकबळी होणे ही नित्याचीच बाब होती. विसाव्या शतकापूर्वी हिंदुस्थानावर सत्ता गाजवणारे राजे-महाराजे बऱ्या-वाईट मार्गांचा अवलंब करून जनतेची पिळवणूक करीत होते. त्यातून आपले राजेपण ऐश्वर्य, भव्यदिव्य राजप्रासाद इत्यादींचा ते भोग घेत होते. ब्रिटिश हिंदुस्थानात आले त्यानंतर जनतेला थोडाफार दिलासा मिळाला पण तोही संस्थानिक, जहागीरदार, जमीनदार यांनी आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन, ब्रिटिशांची खुशमस्करी करूनच! जनतेला कोणीच वाली नव्हता. स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या एक-दोन दशकात परिस्थिती बदलत चालली होती. तरीही दुष्काळ, अवर्षण अशा नैसर्गिक संकटांचा फेरा काही चुकत नव्हता. अन्नधान्याची टंचाई ज्या-ज्या वेळी निर्माण झाली त्या-त्या वेळी परदेशातून धान्याची आयात करून एतद्देशीयांची गरज भागवली जात होती, कारण ब्रिटिशांनी भारतातील कापूस नेऊन तयार कापड आयात करण्याची सवय भारतीयांना लावून ठेवली होती. जे भारतात पिकत नाही मिळत नाही, ते आयात करण्याची प्रथाच पडून गेली होती.

पंडित नेहरूंना, अन्नधान्य पिकवणारी शेती मागासलेली आहे, तिच्यावर काहीतरी कायमस्वरूपी उपाय शोधले पाहिजे याची जाणीव झाली होती, परंतु त्यांच्यासाठी अग्रक्रमाचा विषय औद्योगिक विकासाचा होता. त्यांच्या नियोजनात शेतीचा विकास दुय्यम स्थानावर होता. भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थान मिळवून देणे हा देखील पंडित नेहरूंच्या राजकारणाचा स्थायीभाव होता आणि त्यांनी भांडवलवादी

अमेरिका व साम्यवादी रशिया यांच्यात जागतिक वर्चस्वासाठी संघर्ष चालू असताना अलिप्त राष्ट्रांची तिसरी फळी उभी करून, भारताला जगाच्या नकाशावर महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. देशांतर्गत व्यवस्थेत आर्थिक विकास करण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर अवजड उद्योग उभे केले. परंतु शेतीच्या विकासासाठी त्यांनी धरणे, रासायनिक खतांचे कारखाने, कृषी विद्यापीठे असे काही पायाभूत कार्यक्रम त्यांनी राबवले असले तरी या उपायांचा शेतकऱ्यांना व जनतेला प्रत्यक्ष उपयोग झाला नव्हता. परिणामी, सतत येणाऱ्या दुष्काळाच्या फेऱ्यात जनतेला अन्नधान्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत असे आणि त्यावर उपाय म्हणून भारत सरकार परदेशातून विशेषत: अमेरिकेतून मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची आयात करीत असे.

या परिस्थितीत दुष्काळ, पूर, साथीचे रोग यावर तातडीने उपाय शोधण्याची गरज **स्वतंत्र भारत राजकीयदृष्ट्या अडचणीत आल्यानंतरच भारत सरकारला भागच पडले.** पाकिस्तान परंपरागत विरोधक राष्ट्र असल्याने त्याच्याशी संघर्ष हा नित्याचाच मामला होता. १९६५ साली पाकिस्तानचा भारताने पराभव केल्यानंतर **पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींनी 'जय जवान, जय किसान' ही घोषणा केवळ आपल्या जवानांचे कौतुक करण्यासाठी केली नव्हती, तर जवानांच्या पाठीवर शाबासकीची थाप त्यांना द्यायचीच होती. त्याचबरोबर पाकिस्तानला कायम पाठिंबा देणाऱ्या अमेरिकेकडून भारताला वारंवार आवश्यक असलेल्या धान्याची आयात करणे अवघड जाणार होते. त्यावर मात करण्याचा एक भाग म्हणून देशातच धान्योत्पादन करण्याची निकड होती. त्यासाठी देशातील शेतकऱ्याला धान्योत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज त्यांना निकड वाटत होती. या मोहिमेचा शुभारंभ परकीय आक्रमणाला रोखणारे जवान जितके महत्त्वाचे आहेत, तितकेच किसानदेखील आहेत. 'जय जवान, जय किसान' ही घोषणा देण्यापाठीमागे पंतप्रधानाचा हाच उद्देश होता.** शेतकऱ्याला जागे करण्यास पंतप्रधानांची ही घोषणा अत्यंत उपयोगी पडली. हरित क्रांतीची ही नांदी होती. ज्या शेतकऱ्यांनी पुढील काळात आपल्या कर्तृत्वाने हरित क्रांती यशस्वी केली त्यास दुर्न्वयाने का असेना, हरित क्रांतीचा हा एक फायदाच होता. शेतकरी जागा झाला, आपल्यावर राज्यकर्ते विश्वास दाखवतात ही गोष्ट शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास कारणीभूत ठरली.

हरित क्रांतीमुळे कृषिक्षेत्रात औद्योगिक क्रांतीही झाली. ट्रॅक्टरसारख्या शेतीला अवजारे निर्माण करण्यात ट्रॅक्टरचे कारखाने निघाले, त्यासाठी आवश्यक असलेल्या विविध साहित्यांची निर्मिती करणारे छोटे-छोटे उद्योग उभे राहिले. या उद्योगधंद्यांत काम करण्यासाठी कामगार हवे होते. कुशल-अकुशल कामगारांच्या हाताला काम मिळाले. रासायनिक खतांची निर्मिती करण्यासाठी रासायनिक उद्योग उभे राहिले. तेथेही रोजगारनिर्मिती

झाली. शेतीविषयक शिक्षण व संशोधन करण्यासाठी कृषी विद्यापीठे व कृषीमहाविद्यालये सुरू झाली. तेथून हरित क्रांतीला आवश्यक शिक्षण मिळू लागल्यामुळे हरित क्रांतीला वेग आला. शेतीउद्योगात रोजगारनिर्मिती व कृषीविषयक ज्ञान व संशोधन मिळण्याची संधी केवळ हरित क्रांतीमुळेच मिळाली.

हरित क्रांतीवर असाही एक आक्षेप घेतला जातो की, क्रांतीचा लाभ बड्या जमीनदारांनीच घेतला किंवा त्यांना मिळाला. त्यामुळे शेतकरी वर्गात बडे शेतकरी व छोटे किंवा गरीब शेतकरी अशी विषमता निर्माण झाली. हा आक्षेप काहीअंशी खरा असला तरी बड्या-छोट्या शेतकऱ्यांकडे कामासाठी येणाऱ्या **शेतमजुरांच्या हातांना कामही मिळाले. पर्यायाने येथेही रोजगारनिर्मिती झाली. तसेच हरित क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात छोट्या शेतकऱ्यांनीही आपले उत्पादन वाढविण्यासाठी बड्या शेतकऱ्यांचा आदर्श आपल्यासमोर ठेवून त्यांनीही आपले शेतीउत्पादन वाढवले.** त्यांच्या जगतातदेखील हरित क्रांती झाली.

कृषी उत्पादनाला योग्य किंमत मिळाली पाहिजे अशी मागणी शेतकऱ्यांकडून येऊ लागली. शेतकरी संघटित होऊ लागला. शेतकरी संघटना उभ्या राहिल्या आणि आपल्या उत्पादनास 'मागणी पुरवठा' या बाजारपेठीय हेलकावे बसू नयेत, व्यापारी-दलाल यांच्या स्वार्थी कृतीमुळे आपली कोंडी होऊ नये यासाठी हरित क्रांती काळात शेतमालास हमी भाव मिळावा अशी जोरदार मागणी आली. आपल्या शेतमालाचा उत्पादन खर्च व त्यावर योग्य नफा याचा विचार करून किंमत ठरविण्यात यावी अशी शेतकरी संघटनांनी ठोस मागणी केली. हा ठाम आत्मविश्वास हरित क्रांतीनेच दिला.

पारंपरिक शेती **अवजारे व शेत कसण्याची पद्धत यांच्या जागी आधुनिक-अत्याधुनिक शेती अवजारे, शेतकऱ्यांचे श्रम वाचविणारी यांत्रिक शेतीपद्धती आणि पाऊस-पाण्यासाठी** निसर्गाच्या लहरीस बळी पडावे लागू नये म्हणून छोटी-मोठी धरणे, पाटबंधारे, कालवे, भूगर्भातील जलप्राप्तीसाठी बोअर-विहिरी असे अनेक बदल केवळ हरित क्रांतीमुळे घडून आले.

**एकंदरीत भारतातील 'हरित क्रांती' कृषिक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणारी** ठरली. या काळात जमीन मालकीचे सुधारणा करणारे कायदे, शेतीसाठी पाणीपुरवठा, कर्जपुरवठा, शेतमालाच्या किमती, शेतीमालाची विक्री व्यवस्था, कृषी शिक्षण व संशोधन, शेतीविषयक धोरणे, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील रोजगार, शेतीमाल उत्पादनासाठी रासायनिक खते इत्यादीसंबंधी इतके बदल व सुधारणा झाल्या आहेत की, हरित क्रांती देशाला वरदानच ठरली आहे.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. जागतिक हरित क्रांतीचे जनक म्हणून ........ यांना ओळखले जाते.

*(अ) इंदिरा गांधी* *(ब) विन्स्टन चर्चिल*

*(क) हो चि मिन्ह* *(ड) नॉर्मन बोरलॉग*

२. भारताने कृषीविषयक प्रयोगासाठी ........ इतकी जमीन निवडली.

*(अ) ३ कोटी २० लाख एकर* *(ब) ५ कोटी ७ लाख एकर*

*(क) २ कोटी ५० लाख एकर* *(ड) ७ कोटी २४ लाख एकर*

३. पी.एल. ४८० योजनेच्या करारावर भारताने ......... या साली स्वाक्षरी केली.

*(अ) १९५६* *(ब) १९५४* *(क) १९४७* *(ड) १९६७*

४. स्वातंत्र्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासमोर ....... हे पहिले उद्दिष्ट होते.

*(अ) कुटुंबनियोजन* *(ब) जागतिक शांतता*

*(क) हरित क्रांती* *(ड) उद्योग व कृषी*

५. हरित क्रांतीच्या लाभापासून ........ हा वर्ग वंचित राहिला.

*(अ) श्रीमंत जमीनदार* *(ब) मध्यम शेतकरी*

*(क) अल्पभूधारक शेतमजूर* *(ड) नोकर वर्ग*

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) कृषीविषयक धोरण (ब) कृषी विद्यापीठे

(क) नि:सत्त्व अन्नधान्याची निर्मिती (ड) शेतजमिनीतील स्थायी सुधारणा.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

१. भारतात अन्नधान्याची कारणे विशद करा.

२. हरित क्रांतीची गरज का भासली याचे सविस्तर विवेचन करा.

३. हरित क्रांतीची संकल्पना व अर्थ स्पष्ट करा.

४. हरित क्रांतीची नांदी कशी झाली याचे स्पष्टीकरण करा.

५. हरित क्रांतीचे महत्त्व सांगा.

❖❖❖

प्रकरण १

# शेतकरी संघर्ष

(Agrarian Struggles)

## १. तेलंगण (आंध्रप्रदेश) मधील शेतकरी संघर्ष

**(Agrarian Struggles in Telangana - Andhra Pradesh)**

### मागोवा

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश राजवटीत समाजातील आर्थिकदृष्ट्या अत्यंत दरिद्री आणि समाजातील उच्च वर्गीयांकडून नाडला गेलेला वर्ग म्हणजे शेतकरी, शेतमजूर व शेतीवर राबणारी कुळे हाच होता. हा वर्ग आपल्या किमान गरजा आपल्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर कसेतरी भागवत होता. परंतु ब्रिटिशांनी आपले महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी जमीनदारी, रयतवारी व महालवारी व्यवस्था सुरू केल्यानंतर महसुली उत्पन्नात वाढ झाली, मात्र शेतीवर जगणारे शेतमालक, कुळे यांच्याकडून जमीनदारांनी शेती उत्पादनाचा विचार न करता भरमसाट दराने वसुली केली. दरम्यान जमीनदार शेतमालक झाले आणि त्यांच्या शेतीवर खंडाने वा वाट्याने जगणारी कुळे झाली. परिणामी, त्यांच्या दैन्याला पारावार राहिला नाही. पराकोटीच्या जुलमी पद्धतीने त्यांच्याकडून वसुली होऊ लागली. अशा परिस्थितीत अन्यायाची परमावधी झाल्यानंतर अन्यायाविरुद्ध बंडखोरी होणे नैसर्गिक असते. शेतकऱ्यांवर सर्व बाजूंनी अन्याय होऊ लागल्यानंतर हिंदुस्थानच्या काही भागांत शेतकऱ्यांच्या चळवळी सुरू झाल्या व त्यातून छोटे-मोठे उठावही झाले. अशा प्रकारचे पहिले बंड १७८३ साली बंगाली शेतकऱ्यांनी जुलमी जमीनदारांविरुद्ध केले होते. हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील मलबार भागातील मुस्लीम मोपला जमातीने ब्रिटिशांविरुद्ध बळजबरीने ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याच्या अन्यायाविरुद्ध बंड उभारले होते, परंतु मोपल्यांचे बंड मुख्यत: तेथील वाढीव शेतसाऱ्याविरुद्ध होते. तेथील शेतसारा १८६२ ते १८८० या काळात २४४ टक्क्यांनी वाढवला होता. जमिनी काढून घेण्याचे प्रमाण ४४१ टक्क्यांवर गेले होते. मोपल्यांनी धर्मांतराविरुद्ध केलेल्या बंडाची तीव्रता मोपला शेतकऱ्यांच्या चळवळीपेक्षा कमी असली, तरी मोपला शेतकऱ्यांनी केलेली सशस्त्र चळवळ दखल घेण्यासारखी होती. दक्षिण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनीही १८६० च्या दशकात त्यांच्या कापसाचे भाव अचानक कोसळल्यामुळे चळवळ सुरू केली होती. त्याच वेळी ब्रिटिश सरकारने शेतसारा वाढवल्यामुळे शेतकऱ्यांना कर्जबाजारी व्हावे लागले आणि कर्ज देणारे मारवाडी सावकार होते. या मारवाड्यांनी

सरकारच्या मदतीने जप्त्या आणून कर्जवसुली करण्याच्या कारवाईमुळे शेतकरी हैराण झाले होते म्हणून त्यांनी १८७५ मध्ये चळवळ केली होती. बंगालमध्ये सधन शेतकरी असलेल्या 'महाजन' सावकारांविरुद्ध पबना जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पबना संघ स्थापन करून १८८० च्या सुमारास शेतकरी चळवळ सुरू केली होती. ब्रिटिशांनी रयतवारी पद्धत सुरू केल्यानंतर जमिनीचा शेतसारा निश्चित केला होता, परंतु त्यामध्ये वारंवार वाढ केली, त्यामुळे सारावाढीविरुद्ध असंतोष माजला. १८९३-९४ मध्ये शेतसाऱ्यात ५० ते ७० टक्के वाढ केली. या वाढीविरुद्ध आसाम, बंगाल, गुजरात आणि मुंबई इलाख्यातील दक्षिण भाग येथे शेतकऱ्यांनी साराबंदीची चळवळ उभी केली होती. मात्र या चळवळी ब्रिटिश सरकारने वेगवेगळे उपाय योजून मोडून काढल्या होत्या. १९०५ नंतर काही भागातील आदिवासी शेतकऱ्यांनीही चळवळी केल्या होत्या. दक्षिण आंध्र, मध्य प्रदेश, ओरिसा, बिहार, दक्षिण राजस्थान, गुजरात, बंगाल या प्रांतांतील आदिवासी शेतकऱ्यांच्या जंगलभागातील जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी जमीनदार, सावकार यांनी सरकारच्या मदतीने काढून घेण्याचे ठरविले. त्याविरुद्ध तेथील आदिवासी शेतकऱ्यांनी चळवळ उभारली. या चळवळींना ब्रिटिश सरकारच्या आदिवासी विरोधी कारवाईमुळे फारसे यश लाभले नाही. तरीही शेतकऱ्यांचा असंतोष लक्षणीय होता याची नोंद घेण्याची गरज आहे.

### स्वातंत्र्योत्तर काळ

स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकऱ्यांच्या चळवळी मुख्यत: ब्रिटिश सत्ता आणि जमीनदार, सरंजामदार, सावकार यांनी केलेल्या अन्यायांविरुद्ध होत्या, चळवळींचे स्वरूपही भागनिहाय वेगवेगळे होते. स्वातंत्र्योत्तर काळात शेतकऱ्यांना स्वकीयांविरुद्धच न्याय मागण्यासाठी संघर्ष करावा लागला होता. त्यात स्वातंत्र्यपूर्व काळाचा वारसा घेऊन आलेला आंध्र शेतकऱ्यांचा संघर्ष व पातियाळा व पूर्व पंजाब (पेप्सू -Patiala and East Punjab States.Union - PEPSU) जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे स्वातंत्र्यानंतरही चालू राहिलेले संघर्ष महत्त्वाचे होते. विशेषत: आंध्र शेतकऱ्यांच्या संघर्षाने १९६० नंतर नक्षलवादी किंवा माओवादी रूपात सशस्त्र संघर्षाचे स्वरूप घेतले. १९८० च्या दशकानंतर अनेक राज्यात शेतकऱ्यांच्या संघटना तयार होण्यास प्रारंभ झाला आणि या नव्या शेतकरी संघटनांनी आपल्या संघर्षांना मोर्चे, सार्वत्रिक सभा-मेळावे, 'रास्ता रोको' निदर्शने असे लोकशाहीच्या साच्यात बसणारे रूप दिले. १९६० ते १९८० या काळात मध्य प्रदेश-बिहारमधील खारवार आदिवासी चळवळ (१९५७-५८), महाराष्ट्राच्या धुळे जिल्ह्यातील भिल्ल आदिवासींची चळवळ (१९६७-७५) व मार्क्सवादी ख्रिश्चन नेता प्रदीप प्रभूने काश्तकार संघटनेच्या माध्यमातून चालवलेली वारली आदिवासींची चळवळ (१९७८)

अशा चळवळी चालूच होत्या. १९७० मध्ये समाजवादी-प्रजासमाजवाद्यांनी साम्यवाद्यांप्रमाणे 'जमीन बळकाव' मोहीम हाती घेतली होती. पंजाब व आंध्र प्रदेश शासनाने चांगल्या प्रतीच्या पिकांसाठी व त्यातून उत्पादित झालेल्या धान्यांना चांगली किंमत मिळावी यासाठी सिंचनयोजना कार्यान्वित केल्या होत्या, त्यांचा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांवर 'लेव्ही' लादली होती. या सक्तीच्या लेव्हीला तेथील शेतकऱ्यांचा सक्त विरोध होता. १९६८ साली आंध्राच्या मोगा भागात साम्यवाद्यांनी 'भारतीय खेत मजदूर संघ' स्थापन करून शेतकरी चळवळीस अखिल भारतीय स्वरूप दिले. तंजावर आणि केरळ भागात शेतमजूर व कुळे यांच्या चळवळी सुरू झाल्या. या विविध राज्यांतील शेतकऱ्यांच्या चळवळीमुळे कृषीविषयक सुधारणा करण्याची निकड शासनाला जाणवू लागली. 'हरित क्रांती' (Green Revolution) ही अशा कृषीविषयक सुधारणांची परिणतीच होती.

भारत स्वातंत्र्यप्राप्तीच्या उंबरठ्यावर असताना (१९४५-४७) साऱ्या भारतभर शेतकऱ्यांच्या चळवळीने उग्र रूप धारण केले होते. त्यांपैकी बंगालमधील साम्यवाद्यांनी, शेतमालापैकी $\frac{२}{३}$ हिस्सा शेतकऱ्यांना मिळावा यासाठी तेथील बड्या जमीनदारांविरुद्ध (जोतेदार) सुरू केलेली तेभागा चळवळ महत्त्वाची समजली जाते. त्याचप्रमाणे पंजाबमधील शेतकऱ्यांनी चालवलेली चळवळदेखील गंभीर होती, परंतु पंजाबमधील शेतकरी चळवळीस हिंदू-मुस्लीम संघर्षाने व पाकिस्तान निर्मितीच्या घटनेमुळे चांगलाच फटका बसल्यामुळे चळवळ थंडावली. मात्र **भारतात विलीन होण्याच्या विरोधात असलेले निजामाचे हैद्राबाद संस्थान व पातियाळा-पेप्सू संस्थान येथील शेतकरी चळवळी चालूच राहिल्या. या दोन्ही संस्थानातील शेतकरी चळवळी साम्यवाद्यांच्या नेतृत्वाखाली असल्याने त्यास राजकीय धार आली होती.**

## तेलंगणातील शेतकरी संघर्ष

स्वातंत्र्यपूर्व काळात हैद्राबाद संस्थानात निजाम या मुस्लीम संस्थानिकाविरुद्ध काँग्रेस व आंध्र महासभा या राजकीय पक्षांनी राष्ट्रीय चळवळ चालवलेली होती. १९३० नंतर या दोन्ही पक्षांनी हैद्राबाद या संस्थानातील तेलगू भाषिक तेलंगण भागामध्ये तेथील सरंजामी जमीनदारांच्या अत्याचारांविरुद्ध संघर्ष सुरू केला होता. १९४० नंतर दुसऱ्या महायुद्धात कम्युनिस्ट रशिया इंग्लंड-अमेरिका गटात सामील झाल्यामुळे तेलंगण आंध्रमधील कम्युनिस्ट पक्षावर असलेली बंदी ब्रिटिश सरकारने उठवली. या काळात कम्युनिस्टांनी आपला प्रभाव इतका वाढवला होता की, त्यांच्यावरील बंदी उठवली जाताच त्यांनी आंध्र महासभावर कब्जा मिळवला आणि तेलंगणातील बडे जमीनदार व देशमुख यांच्या सक्तीने धान्यवसुली व वेठबिगार पद्धतीविरुद्ध जोरदार चळवळ सुरू केली. या चळवळीत

शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी झालेल्या जोरदार संघर्षाप्रसंगी कम्युनिस्टांनी गरीब शेतकऱ्यांच्या बाजूने लढून मागण्यांचे समर्थन केले. त्यामुळे चळवळीला जोर चढला व चळवळीवर कम्युनिस्टांचा प्रभावही वाढला.

**हैद्राबादच्या निजामाविरुद्ध विजय**

भारतीय संघराज्यात संस्थान विलीन होण्यास नकार देणाऱ्यांमध्ये हैद्राबाद संस्थानाधिपती निजाम हा एक होता. त्यास पाकिस्तान व काही ब्रिटिश अधिकाऱ्यांची अंतर्गत फूस होती. विलीनीकरणास विलंब होत असल्यामुळे संस्थानातील जनता अस्वस्थ होऊ लागली. राज्यातील काँग्रेसने व कम्युनिस्टने जनतेला सर्वतोपरी पाठिंबा दिला. त्यांनी लढ्यासाठी महाराष्ट्राच्या सीमेवरील काँग्रेस नेते व आंध्राच्या किनाऱ्यावरील जनता यांच्या सहकार्याने सशस्त्र छावण्या उभारल्या. निजामाला पाठिंबा देणाऱ्या रझाकारांना हैद्राबाद संस्थानातील बडे जमीनदार व मुस्लिमांचे साहाय्य होते. संस्थानाच्या विलीनीकरणासाठी आंध्रातील जनता व रझाकार यांच्यात जोरदार सशस्त्र लढाच सुरू झाला. या लढ्यात कम्युनिस्टांनी प्रत्यक्ष भाग घेऊन जनतेला साथ दिली. त्यामुळे ऑगस्ट, १९४७ ते सप्टेंबर, १९४८ या काळातील निजामविरोधी लाटेत कम्युनिस्टांनी तेलंगणातील लोकांच्या बाजूने लढा दिला आणि त्यात ते यशस्वीही झाले. साहजिकच, आंध्रातील नळगोंडा, वरंगळ व खम्माम जिल्ह्यात त्यांचा खूपच प्रभाव वाढला. या भागातील बडे जमीनदार भयभीत होऊन जमिनी, वाडे-घरेदारे सोडून अक्षरशः शहराकडे पळून गेले. कम्युनिस्टांना तर रान मोकळेच झाले, त्यांनी शेतकऱ्यांना संघटित केले आणि त्यांना शस्त्रे पुरवून रझाकाराविरुद्ध गनिमी काव्याने लढा देऊन त्यांना हैराण केले. त्याही पुढे जाऊन त्यांनी सुमारे ३००० गावावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. जमीनदार-सावकारांनी १९२९-३० च्या मंदीच्या काळात बळकावलेल्या जमिनी त्यांनी मूळ शेतकऱ्यांना दिल्या. ज्या सावकारांनी कर्जफेडीच्या पोटी शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या होत्या त्या जमिनीही त्या-त्या शेतकऱ्यांना परत देण्यात आल्या. पडीक जमिनी व जंगलातील मोकळ्या जमिनीही भूमिहीनांमध्ये वाटण्यात आल्या. शेतमजुरांची मजुरी वाढवण्यात आली. याही पुढे जाऊन कम्युनिस्टांनी कौटुंबिक बाबतीत हस्तक्षेप करून बायकोला मारण्या-झोडण्याचे प्रकार गरीब कुटुंबात होत असतात, त्यालाही त्यांनी आळा घातला.

**कमाल जमीन धारणा व भूमिहीनांना जमीन वाटप**

तेलंगण-आंध्रातील कम्युनिस्टांचा वाढता प्रभाव आणि बड्या जमीनदारांचे शहरी भागात पलायन यामुळे जमीनविषयक वाटप करण्यास कम्युनिस्टांना संधी मिळाली. त्यांनी एका शेतकऱ्याकडे कमाल जमीन किती असावी यासंबंधी फतवाच जाहीर केला,

कम्युनिस्टांनी कमाल जमीन धारणा ५०० / १००.
२१५४१, १४०० ...
वंशपरंपरागत वाटप



त्यानुसार एका शेतकऱ्याकडे जास्तीतजास्त ५०० एकर जमीन असावी असे त्यांनी प्रथमत: जाहीर केले, पण ही मर्यादा जास्त आहे असे त्यांना वाटल्यावरून कालांतराने ही मर्यादा १०० एकरापर्यंतच असावी असे जाहीर केले आणि उर्वरित जादा जमीन, भूमिहीन आणि अत्यल्प भूधारक यांच्यात वाटून देण्यात आली. अशा जमीन वाटपामध्ये काही अडचणीही निर्माण झाल्या. कमाल जमीनधारणेपेक्षा (म्हणजे १०० एकर) जी जादा जमीन होती, तिचे वाटप करताना असे ठरविण्यात आले की, जमीनदाराकडे वाटप करण्यापूर्वी जी जमीन होती तिची मालकी अन्य एखाद्या शेतकऱ्याकडे असण्याची शक्यता होती. जर एखाद्या शेतकऱ्याने शपथेवर सांगितले की, सदरची जमीन त्याचे आजोबा-पणजोबा यांच्या मालकीची होती तर त्या जमीन वाटपाच्या वेळी ती जमीन त्या शेतकऱ्यास देण्यात येत असे. कम्युनिस्टांनी पडीक आणि जंगलातील मोकळ्या जमिनीही ताब्यात घेतल्या होत्या, त्यांचे वाटप करताना असे सूत्र ठरविण्यात आले की, एखाद्या शेतकऱ्याने आपली जमीन अमुक एका जमीनदाराकडे आहे, पण ती जमीन त्या जमीनदाराने दुसऱ्याच एका जमीनदारास वा शेतकऱ्यास विकली आहे तिचा ताबा मूळ शेतकऱ्यास देणे शक्य नसते, अशा प्रसंगी कम्युनिस्टांनी ताब्यात घेतलेली पडीक वा जंगलातील जमीन देण्याची कारवाई केली. ही कारवाई लोकांना फारशी पसंत पडत नव्हती. सर्वसाधारणपणे जमीनदाराकडील जादा जमिनीवरील हक्क वंशपरंपरेने ज्या शेतकऱ्याच्या वाडवडिलांकडे आहे त्यास ती जमीन दिली जात असे. भूमिहीनांना जमीन वाटप करण्याची ही कारवाई कालांतराने थांबली. शेतकऱ्यांची चळवळही विसावली. त्यानंतर जादा जमीन मिळण्याची वा मिळवून देण्याची कारवाई देखील कम्युनिस्टांनी थांबवली.

**हैद्राबाद मुक्तीनंतर** १३ सप्टें 1948. सैनिकी कारवाई.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील बहुतेक सर्व संस्थाने भारतीय संघराज्यात सामील झाली होती. परंतु हैद्राबादच्या निजामाने आडमुठेपणा स्वीकारून जवळपास एक वर्ष भारताच्या आवाहनास प्रतिसाद दिला नाही. दरम्यान या काळात हैद्राबाद संस्थानातील प्रजेने निजामविरोधी आंदोलन उभे केले होते. कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी या आंदोलनास पाठिंबा दिल्यामुळे आंदोलनाने रौद्र रूप धारण केले. जसजसे हे आंदोलन तीव्र होत गेले, तसतसे भारताने हैद्राबादच्या मुक्तीसाठी पोलिसी कारवाई करण्याची तयारी केली, आणि १३ सप्टेंबर, १९४८ रोजी भारतीय लष्कर पोलिसी कारवाईच्या रूपात हैद्राबाद संस्थानात घुसले आणि २४ तासांच्या आत हैद्राबाद निजामाच्या तावडीतून मुक्त केले. संस्थानातील जनतेने भारतीय लष्कराचे जल्लोषात स्वागत केले. निजामानेही शरणागती पत्करली. हैद्राबादच्या मुक्तीनंतर भारतीय लष्कर निजामाच्या आणि

पाकिस्तानच्या पाठिंब्यावर जे रझाकार संस्थानी जनतेवर अत्याचार करीत होते त्यांना संपविण्यासाठी ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या मदतीला धावले आणि चार-पाच दिवसात त्यांना शस्त्रे खाली ठेवण्यास भाग पाडले. हैद्राबाद आंदोलन कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली चालू होते, त्यासाठी शस्त्रांचाही सर्रास उपयोग केला होता. हैद्राबाद मुक्त झाल्यानंतर आंदोलनात भाग घेतलेले शेतकरी व अन्य गट यांना भारतीय लष्कराने शस्त्रे आपल्याकडे सोपवण्याचे फर्मान काढले. दरम्यान हैद्राबाद जसे निजामाच्या तावडीतून मुक्त केले तसे तेलंगण-आंध्रमधील साम्राज्यवादी हितसंबंध सांभाळणारे व नेहरू सरकारला पाठिंबा देणारे बडे जमीनदार, उद्योगपती यांच्याविरुद्ध सशस्त्र लढा देण्याचे कम्युनिस्टांनी जाहीर केले व ज्या गनिमी पद्धतीने रझाकाराविरुद्ध लढा केला, त्याच तऱ्हेने भारतीय लष्कराविरुद्ध लढा देण्याचे आदेश शेतकऱ्यांनाही दिले. अर्थात, अद्ययावत शस्त्राने सज्ज असलेल्या लष्करासमोर मध्ययुगीन जुनीपानी ढाल-तलवारी, धनुष्यबाण आणि ठासणीच्या बंदुकीने लढणारे कम्युनिस्ट टिकाव धरू शकले नाहीत. त्यांनी काही काळ लपूनछपून जंगल झाडीतून लष्कराशी लढा दिला, परंतु त्यांना यत्किंचितही यश आले नाही. १९५१ साली कम्युनिस्टांनी माघार घेतल्यानंतर भारतीय लष्कर हैद्राबाद कारवाईवरून परतले. कम्युनिस्टांनी काही काळ रशियातील कम्युनिस्टांशी संपर्क साधून त्यांच्याकडून मदत मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. उलट, भारतीय लष्कराशी लढताना सुमारे ७०० जणांना प्राण गमवावे लागले आणि दहा हजारांहून अधिक जणांना तुरुंगाची हवा खावी लागली.

### तेलंगणातील शेतकरी चळवळीची फलश्रुती

हैद्राबाद मुक्त करण्याचे भारताचे उद्दिष्ट पूर्ण होताच भारत सरकारने, मुक्तिसंग्रामापूर्वी ज्यासाठी तेलंगण-आंध्रातील शेतकऱ्यांनी चळवळ उभारली होती त्या उद्दिष्टपूर्तीसाठी तत्काळ पावले उचलली.

(१) १९४९ साली तेलंगणातील जहागीरदारी विसर्जित करण्याचा कायदा मंजूर केला. (२) १९५० साली हैद्राबाद कूळकायदा केला. त्याच वेळी शेतीविषयक कायदाही मंजूर केला. (३) १९५५ च्या सुमारास कमाल जमीनधारणा कायदा लागू करण्यात आला. अशारीतीने शेतकरी हितसंबंध रक्षण करण्याच्या शासनाच्या कायद्यामुळे तेलंगणातील शेतकरी जमीनदारांच्या कचाट्यातून बऱ्याचअंशी मुक्त झाला. तेलंगण-आंध्र राज्यातील $\frac{१}{४}$ बागवडी जमीन कसणाऱ्या ६ लाखांहून जास्त कुळांना अल्प मोबदल्यात जमीनदारांची कसत असलेली जमीन विकत घेण्याचा हक्क मिळाला. शेतकऱ्यांमध्ये राजकीय हक्काबाबतची जागृती झाल्यामुळे शेतीसुधारणा सहजपणे करणे शक्य झाले.

जमीनदार चळवळ होण्यापूर्वी कुळांना जशी वागणूक देत होते तशी वागणूक देणे शक्य नव्हते. या कायद्यान्वये कुळांना संरक्षण मिळाले आणि अल्प किंमतीत जमीनदारांची जमीन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. जमीनदारांनीही या कायद्यास सकारात्मक प्रतिसाद देत कमी किमतीलाही कुळांना जमीन विकण्याची तयारी दर्शवली. शेतमजुरीचे दर वाढवण्यास ते राजी झाले. त्याचप्रमाणे कमाल जमीनधारणा कायद्यानुसार जितकी जमीन जमीनदाराकडे राहील त्यापेक्षा अधिक असणारी जमीन कमी किमतीस विकण्याची तयारीही जमीनदारांनी दाखवली. या शेतकरी चळवळीने तेलंगणातील जमीनदारी व्यवस्थेचे कंबरडेच मोडले. मात्र या चळवळीच्या यशाचे श्रेय कम्युनिस्टांनी उपटले. भविष्यात तेलंगणातील कम्युनिस्टांनी नक्षलवादी चळवळीचा फायदा घेऊन भारतीय लोकशाही व्यवस्थेला धक्के देण्याची जी कृती आरंभली त्याची मुळे या तेलंगणातील शेतकरी चळवळीत दिसून येतात.

## २. शेतकरी संघटना (महाराष्ट्र)

### शेतकरी चळवळीचे बदललेले रूपडे

स्वातंत्र्योत्तर नजीकच्या काळात सामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सत्ताधारी नेत्यांनी शासनाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, औद्योगिक आणि कृषीविषयक सुधारणा करण्यासाठी पावले उचलली. पंतप्रधान नेहरूंनी औद्योगिक सुधारणा करण्यासाठी अवजड उद्योग अग्रक्रमाने उभारले. कृषीविषयक सुधारणा करताना खत, कारखाने, धरणे बांधणे, कृषी विद्यापीठांची स्थापना करणे इत्यादी कामेही त्यांनी हाती घेतली. जमीनविषयक सुधारणादेखील घटनेतील दुरुस्त्यांद्वारे करण्यात आल्या. मात्र बड्या जमीनदारांकडे असलेली शेकडो एकर जमीन व त्यावर राबून उदरनिर्वाह करणारे शेतकरी यांचे परस्परांचे संबंध यावर शासनाचे फारसे लक्ष नव्हते. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी काही प्रांतांत शेतकऱ्यांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी काही राजकीय नेत्यांनी काही प्रांतांत शेतकऱ्यांच्या चळवळी सुरू केल्या. विशेषत: तेलंगण-आंध्र प्रांतांत कम्युनिस्ट नेत्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेऊन त्यांच्या संघटना बांधल्या होत्या व बड्या जमीनदारांविरुद्ध जमीनमालकीसंबंधी संघर्ष मांडला होता. पातियाळा, पंजाब, पश्चिम बंगाल येथील शेतकऱ्यांनीही जमीनदारी संपुष्टात आणण्यासाठी चळवळ सुरू केली होती. या सर्व चळवळी राजकीय पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अगदी धिम्या गतीने चालू होत्या. शेतकरी प्रत्यक्ष संघटित नव्हता. नेत्यांच्या आदेशानुसार शेतकरी नेत्यांच्या पाठीशी उभा होता. शेतकरी, शेतमजूर, वेठबिगारी या सर्वांना आपल्या मागण्या काय आहेत, कोणत्या मार्गाने त्यांची पूर्तता करता येते इत्यादींची पुसटशीदेखील जाणीव नव्हती. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्यांच्या चळवळी दिशाहीन होत्या. त्याचप्रमाणे

ज्या प्रांतात वा राज्यात ज्या थोड्याथोडक्या चळवळी झाल्या त्या चळवळी कालांतराने थंडावल्या. १९५० ते १९८० या काळात तेलंगण-आंध्र, पश्चिम बंगाल, पेप्सू-पंजाब यांचा अपवाद वगळता उल्लेख करावी अशी कोणतीही शेतकरी चळवळ नव्हती. या काळात शेतकऱ्यांच्या समस्या नव्हत्या अशातला भाग नव्हता, परंतु पंडित नेहरूंच्या औद्योगिक धोरणास अग्रक्रम देण्याच्या धोरणामुळे व स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतलेल्या नेत्यांच्या भोवती सत्तेचे वलय असल्याने शेतकऱ्यांच्या समस्या दुर्लक्षित राहिल्या.

स्वातंत्र्यानंतर पहिल्या तीन दशकात भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी सुधारली होती. त्यांची नवी पिढी शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेऊन नव्या जगाकडे चौकसपणे पाहत होती. वृत्तपत्रे, मासिके इत्यादींच्या द्वारे सभोवतालच्या घटनांकडे जागरूकपणे पाहत आपल्या विकासासाठी आपणच झगडले पाहिजे, असे त्यांना मनोमन वाटायला लागले होते. आपल्या समस्या कोणत्या आहेत याची जाणीव त्यांना झाली होती. कारण आपल्या वाडवडिलांच्या बव्हंशी निरक्षरतेमुळे जे सार्वजनिक, सामाजिक, आर्थिक भान नव्हते ते थोड्याफार प्रमाणात नव्या तरुण पिढीला आले होते. त्यामुळे आपल्या समस्यांवरील उपाययोजना वा मार्ग आपणच शोधले पाहिजेत असे वाटत होते. आपल्या मागण्या आक्रमकतेने शासनासमोर मांडल्या पाहिजेत, त्यासाठी सभा-मेळावे इत्यादी संघटनात्मक आधार घेतलेच पाहिजेत. त्याच्याबरोबर सार्वजनिक जीवन आणि आर्थिक व्यवहार अस्ताव्यस्त होऊन गोंधळाची परिस्थिती निर्माण होईल असे रस्ता रोको, मोर्चे, निदर्शने मार्ग अवलंबले गेले तरच शासन समाजमागण्यांची दखल घेईल हे नव्या पिढीला पटले होते. म्हणूनच स्वातंत्र्यानंतर पहिल्या एक-दोन दशकात शेतकरी आपल्या मागण्यासाठी स्वतःहून भाग घेत नव्हता, त्याची भूमिका कोणाच्यातरी पाठीशी राहण्याची (Passive) होती. नव्या पिढीला आपल्या चळवळीचे मार्ग समाजव्यवस्थेला धक्के देऊन जागे करणारे (Positive) हवे होते. महाराष्ट्रात अशा नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी संघटना १९८० साली उभी राहिली.

## महाराष्ट्रातील शेतकरी संघटना

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा उद्रेक १९८० साली शेतकऱ्यांच्या अस्तित्वावरच घाला घालणाऱ्या एका घटनेने झाला. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव-निफाड भागात मोठ्या प्रमाणावर कांद्याचे पीक घेतले जाते. त्यामुळे लासलगाव ही कांद्याची घाऊक बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. या पेठेतील कांदा महाराष्ट्रालाच नव्हे भारतालाही पुरवला जातो आणि परकीय बाजारपेठेत कांदा निर्यातही केला जातो. देशातील व परदेशातील बाजारपेठेत कांदा जात असल्याने शेतकऱ्याला कांद्याला चांगला भाव मिळत

असे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी सुधारली होती. साहजिकच, कांद्याबरोबर अन्य पिके घेण्याऐवजी शेतकरी आपल्या शिवारात कांद्याचेच पीक घेत असे. १९८० च्या हंगामात या भागात कांद्याचे अमाप पीक आले आणि लासलगावच्या बाजारपेठेत भरभरून ट्रॅक्टर-ट्रॉल्या आल्या व बाजारपेठ शिगोशीग भरून वाहायला लागली. साहजिकच, मागणी-पुरवठा या सिद्धांतानुसार प्रचंड पुरवठा आणि नगण्य मागणी अशी विचित्र परिस्थिती लासलगाव बाजारपेठेत निर्माण झाली. परिणामी, कांद्याचे भाव इतके खाली आले की, कांदा उत्पादनास झालेला खर्चही त्यातून भागण्याची शक्यता नव्हती. कांदा आणणारा शेतकरी नैराश्याने किंकर्तव्यमूढ झाला. बाजारपेठेत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. घाऊक प्रमाणात कांदा खरेदी करणारे व्यापारी आणि गोंधळलेला, हताश झालेला शेतकरी यांच्यात संघर्ष होण्याची पाळी येऊन कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती उद्भवली. व्यापाऱ्यांनी आपली खरेदी थांबवली, त्यामुळे कांदा घेऊन शेकडो शेतकरी चिडले व बाजारात हाणामारीचा प्रसंग उद्भवला. **चिडलेल्या, वैतागलेल्या, हताश झालेल्या शेतकऱ्यांना काबूत ठेवून त्यांना मार्गदर्शन करणारा नेता योगायोगाने मिळाला त्याचे नाव होते शरद जोशी!**

**शेतकरी संघटनेचा नेता शरद जोशी**

**शरद जोशी** हे आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय टपाल संघात (International Postal Union -IPU) अधिकारी होते. त्यांनी या संघातून मुदतपूर्व निवृत्ती (Voluntary Retirement Service-VRS) घेऊन ते नुकतेच भारतात परतले होते. नाशिक भागातील कांद्याच्या भावातील चढ-उताराचा तेथील शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर अनिष्ट परिणाम होत असल्याचे त्यांना दिसून आले. त्या प्रश्नाचा सखोल अभ्यास केला आणि या प्रश्नाची तड लावायची झाल्यास शेतकऱ्यांनाच उद्युक्त केले पाहिजे या निर्णयाप्रत ते आले. योगायोगाने लासलगाव कांदा बाजारपेठेत कांद्याचे भाव कोसळले आणि कांदा उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त होण्याच्या अवस्थेत आला होता. म्हणून शेतकऱ्यांची संघटना बांधणे आणि संघटनेच्या माध्यमातून कांदा खरेदी करणारे व्यापारी व अप्रत्यक्षपणे या स्थितीस जबाबदार असलेले शासन यांच्याशी लढा देणे आवश्यक आहे असे शरद जोशींना प्रकर्षाने वाटले. म्हणून त्यांनी १९८० साली **'शेतकरी संघटना' स्थापन केली आणि शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी ही संघटना कार्य करील हे त्यांनी संघटनेचे उद्दिष्ट जाहीर केले.**

लासलगाव बाजारपेठेतील कांद्याचे कोसळलेले भाव शेतकरी संघटनेस कार्यप्रवण करण्यास उत्तम संधी आहे, असा शरद जोशी यांनी विचार करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न त्यांनी हाती घेतला. सर्व शेतकरी शरद जोशींच्या पाठीशी उभे राहिले. नेहमीचे अर्ज-विनंती, मोर्चे इत्यादी सनदशीर व रुळलेले उपाय सोडून आक्रमक आणि शासन-

दोन लाख शेतकरी सहभागी, रस्ता वाहतूक विस्कळित
१४५



लासलगाव निफाड - शेतकरी आंदोलन

व्यापारी इत्यादींचे सर्व व्यवहार ठप्प झाल्याशिवाय शेतकऱ्यांच्या मागण्यांची तातडीने
दखल घेतली जाणार नाही, म्हणून शरद जोशींनी कांद्याचे भाव वाढवून मिळावेत यासाठी
'रास्ता रोको' आंदोलन जाहीर केले. त्यानुसार १० नोव्हेंबर, १९८० रोजी लासलगाव
भागातून जाणारा मुंबई-कोलकाता आणि मुंबई-दिल्ली रेल्वे मार्ग शरद जोशींच्या
नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी रोखून धरला. तसेच मुंबई-आग्रा रोड आणि उत्तरेकडे जाणारे
इतर रस्तेही शेतकऱ्यांनी रोखून धरले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी शेकडो वाहने थांबली,
रेल्वे वाहतूकही विस्कळीत झाली. 'रास्ता रोको' आंदोलनात दोन लाख शेतकऱ्यांनी
भाग घेतला. वाहतुकींचा खोळंबा झाल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. गोंधळ
आणि अशांतता सावरण्यासाठी पोलीस आले. शेतकरी रस्त्यावरून हटत नाहीत असे
पाहून अश्रुधूर सोडून गोंधळ दूर करण्याच्या पोलिसांच्या प्रयत्नाला आंदोलक दाद देत
नाहीत असे पाहून पोलिसांनी गोळीबार केला. त्यात दोन आंदोलक ठार झाले, हजारोंना
अटक करण्यात आली. शेतकऱ्यांच्या 'रास्ता रोको' आंदोलनाची शासनास तत्काळ
दखल घ्यावी लागली आणि कांद्याचे भाव वाढवून देण्यात आले. व्यापाऱ्यांनीही
आंदोलनाची धास्ती घेतली आणि लासलगाव-निफाड शेतकरी आंदोलन कमालीचे
यशस्वी झाले. 'रास्ता रोको' आंदोलनाच्या यशामुळे ऊस शेतकऱ्यांनीही उसाला योग्य
भाव मिळवण्यासाठी शरद जोशींच्या नेतृत्वाखाली नाशिक, जळगाव, धुळे 'रास्ता
रोको' आंदोलन करण्याचे जाहीर करताच उसालाही भाव वाढवून देण्यात आले. कांदा व
ऊस उत्पादकांच्या शेतकरी चळवळीचे 'रास्ता रोको' या अभिनव मार्गाचे यश पाहून
शरद जोशींनी शेतकऱ्यांच्या अन्य पिकांना रास्त भाव मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रभर हा
प्रयोग त्यांनी सुरू केला. या प्रयोगास पहिल्या काही वर्षांत चांगले यशही मिळाले व
भारतातील अन्य राज्यांतील शेतकऱ्यांना एक मार्गदर्शक उदाहरण मिळाले. शरद जोशींना
शेतकरी संघटनेला महाराष्ट्रात मिळालेले यश महाराष्ट्रापुरतेच मर्यादित करायचे नव्हते..
त्यासाठी या संघटनेला तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी 'शेती हेच सर्वस्व'
आणि शेतीवर सर्वस्वी अवलंबून असणारा ग्रामीण भागात आजीवन वास्तव्य असणारा,
ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा भारत हाच 'खरा भारत' असून शहरात राहणारे, बांधावरची
शेती करणारे, बडे शेतकरी, व्यापारी, नोकरवर्ग, अधिकारी इत्यादी उच्च वर्गीयांचा
भारत नसून तो 'इंडिया' आहे, अशी तत्त्वप्रणाली शरद जोशींनी शेतकरी संघटनेसाठी
प्रतिपादन केली. शेतकरी संघटनेची चळवळ म्हणजे शेतकऱ्यांचा 'भारत विरुद्ध इंडिया'
अशी चळवळ असून शेतकऱ्यांचे हितसंबंध रक्षण करण्यासाठी 'इंडिया' विरुद्ध भारताने
शेतकरी संघटनेचा झेंडा हाती घेतला पाहिजे, असे तत्काळ लोकप्रिय होणारे तत्त्वज्ञान
शरद जोशींनी प्रतिपादन केले.

'भारत विरुद्ध इंडिया'

### उत्तर प्रदेशचे महेंद्रसिंग टिकैत व अन्य राज्यांतील शेतकरी चळवळींचे नेते

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा बोलबाला साऱ्या भारतात झाला. १९८६ साली उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर जिल्ह्यातील शिसौली गावाच्या एका खेड्यातील अल्पशिक्षित, पाच–दहा एकर जमिनीची मालकी असलेले जाट शेतकरी महेंद्रसिंग टिकैत यांनी महाराष्ट्रातील शरद जोशींच्या शेतकरी संघटनेचा आदर्श समोर ठेवून शेतकऱ्यांची संघटना बांधण्याचा प्रयत्न सुरू केला. महाराष्ट्राप्रमाणे उत्तर प्रदेश हे राज्यदेखील मोठ्या प्रमाणावर ऊस शेती करणारे असल्यामुळे महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांना शेतकरी चळवळीमुळे उसाला रास्त भाव मिळाला तसाच भाव उत्तर प्रदेशातील ऊस उत्पादकांना मिळाला पाहिजे. ही मुख्य मागणी महेंद्रसिंग टिकैत यांनी लाखोंच्या संख्येने जमलेल्या शेतकऱ्यांच्या एका प्रचंड सभेत केली. ही मागणी मान्य झाल्याशिवाय ही सभा बरखास्त केली जाणार नाही असे त्यांनी जाहीर केले व राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून या मागणीस मान्यता दिली पाहिजे असा हट्ट धरला. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांना नाइलाजाने या सभेस यावे लागले आणि शेतकऱ्यांच्या मागणीस मान्यता द्यावी लागली. याच सभेत वाढीव वीज बिले कमी करून जुन्या दरानेच वीज बिले भरून घ्यावीत अशीही एक मागणी करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांना या मागणीसही मान्यता द्यावी लागली.

महाराष्ट्र व उत्तर प्रदेश येथील शेतकरी चळवळीच्या यशामुळे अन्य राज्यातील शेतकरी चळवळदेखील वेगाने फोफावली.

तामीळनाडूमध्ये 'विवासयगल संगम' (Vivasayagal sangam), कर्नाटकात 'राज्य ऋतू संघ' (Rajya Ryothu Sangha), पंजाबमध्ये 'भारतीय किसान युनियन', गुजरातमध्ये 'खेडूत समाज' व 'किसान संघ' अशा शेतकऱ्यांच्या संघटना १९८६ च्या दरम्यान स्थापन झाल्या. या सर्व शेतकरी संघटनांतील लाखो शेतकऱ्यांनी आपापल्या राज्यात, विविध मागण्यांसाठी एकाच वेळी 'रास्ता रोको' करून बेमुदत धरणे आंदोलन केले. सरकारी अधिकाऱ्यांना 'घेराव' घातला. राजकीय पुढारी व सरकारी नोकर–अधिकारी यांना गावागावात प्रवेश करण्यास मज्जाव केला. वाढीव वीज बिले रद्द करणे, कर्जावरील व्याज माफ करणे, कर्जफेड न झाल्यास जमीन, मालमत्ता इत्यादींची जप्ती न करणे, कालव्यांच्या पाण्यासाठी पाणीपट्टी रद्द करणे इत्यादी मागण्या मान्य होईपर्यंत शेतकऱ्यांनी रास्ता रोको, बेमुदत धरणे मागे घेतले नाहीत. अधिकाऱ्यांचे घेराव उठवले नाहीत. या उपायांमुळे संबंधितांना तोंडदेखले का असेना मागण्या मान्य कराव्या लागल्या. यातून शेतकरी जागृत झाला व शेतकरी संघटनांचे बळ वाढत गेले.

## शेतकरी संघटना का ?

महाराष्ट्रात वा राज्याराज्यांत शेतकरी संघटना उभ्या राहण्यामागे असा एक समज होता की, शहरी भागातील लोकांना धान्य स्वस्त दरात दिले जावे आणि ग्रामीण भागातून येणारा कच्चा माल कमी किमतीत मिळावा म्हणून सरकारने शेती उत्पादनाच्या किमती कृत्रिमरित्या निश्चित केल्या आहेत. याउलट, शेती उत्पादन घेण्यासाठी लागणारी खते, कालव्याचे पाणी, वीज, ट्रॅक्टरसारखी औद्योगिक उत्पादने यांच्या किमती बाजारभावाप्रमाणे वाढत्या ठेवल्या होत्या. शेतकऱ्यांना हा माल घेण्यासाठी कोणत्याही सवलती किंवा सूट दिली जात नव्हती. साहजिकच, शेतकऱ्याचा माल कवडीमोलाने आणि शेतकऱ्यांना लागणारा माल मात्र सोन्याच्या भावाने अशी परिस्थिती होती. ही बाजारव्यवस्था बदलण्यासाठी शेतकरी संघटनेने आग्रह धरला होता व त्यात काही प्रमाणात यशही संपादन केले होते. त्याचप्रमाणे शेतकरी संघटनेची अशीही एक आग्रहाची मागणी होती की, शेतमालाच्या किमती निश्चित करण्यासाठी 'शेती उत्पादन किंमत आयोग' (Agriculture Produce Price Commission) स्थापन करावा आणि या आयोगाने शेतमाल उत्पादनासाठी येणारा खर्च जमेस धरून शेतमालाची किंमत निश्चित करावी. ही मागणी केंद्रशासनाने पुढील काळात मान्य केली, परंतु आयोगात असलेल्या मंडळींनी शेतमाल उत्पादन करण्यासाठी येणारा खर्च जमेस न धरता शहरी वा तत्सम ग्राहकाला फायदेशीर ठरणारी किंमत निश्चित केली. परिणामी, शेतकऱ्यांचे मूळ दुखणे हटलेच नाही व शेतकरी कायम कर्जबाजारी राहिला.

## शेतकरी चळवळीचे लाभार्थी

शरद जोशींनी शेतकरी संघटना स्थापन करून १९८० च्या दशकात बरेचसे फायदे मिळवून दिले. कांद्याचे योग्य भाव मिळवून दिले, उसालाही योग्य किंमत मिळवून दिली. शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे खुळखुळू लागले हे खरेच आहे. पण ज्या शेतकऱ्यांना हा लाभ मिळाला ते कोण होते? तर ज्यांच्या शेतात आपल्या दैनंदिन गरजा भागवून बरेचसे अतिरिक्त शेती उत्पादन खुल्या बाजारात विक्रीसाठी आणतो त्याच शेतकऱ्याला संघटनेच्या चळवळीमुळे लाभ मिळाला. अशा लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या ८० टक्क्यांहून जास्त होती. या बड्या वा मध्यम शेतकऱ्यांनी हरित क्रांतीमुळे झालेल्या धान्योत्पादन वाढीसाठी आपल्या शेतीमध्ये ट्रॅक्टर, शेतीत मानवी श्रम कमी लागणारी अन्य आधुनिक अवजारे, रासायनिक खते, वीज, अन्य वाहने अशा साधनांचा उपयोग केला. शेतकऱ्यांच्या नावावर शासकीय सवलती मिळवून कमी किमतीत ही साधने पदरात पाडून घेतली. एकंदरीत शेतकरी चळवळीचा, शेतकऱ्यांच्या संघटनांचा लाभ बड्या शेतकऱ्यांनाच झाला. शरद जोशी यांनी शेतकरी संघटना स्थापन करून जी कांदा उत्पादकांमध्ये जागृती

केली, ती फक्त कांदा उत्पादकांपर्यंत मर्यादित राहिली नाही ऊस उत्पादकांपर्यंतही ती पोचली. उसाचा संबंध महाराष्ट्रातील साखर कारखान्यांशी असल्याने साखर कारखान्यांनी शेतकरी चळवळीच्या साहाय्याने उसाला हमी भाव मिळवून घेतला. त्यातून साखर सम्राटही निर्माण झाले. महाराष्ट्राप्रमाणे तामीळनाडूमध्येही शेतकऱ्यांच्या चळवळीचा लाभ तेथील बड्या शेतकऱ्यांनीच घेतला. चळवळीत भाग घेणारे आणि सरकारच्या गोळीबाराला बळी पडणारे अल्पभूधारक शेतकरीच १९८१ मध्ये तामीळनाडूतच होते. अशा छोट्या शेतकऱ्यांनी 'रास्ता रोको' सारखी उग्र आंदोलने केली. त्या वेळी तेथील सरकारने बेछूट गोळीबार करून आंदोलकांना निर्दयपणे ठार मारून चळवळ नेस्तनाबूत केली. तामीळनाडूमध्ये या घटनेनंतर १९८२ मध्ये नायडू या नेत्याने 'श्रमिक व शेतकरी पक्ष' स्थापन करून शेतकरी चळवळीमध्ये जान आणण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा प्रयत्न फसला व नैराश्याने त्याने १९८४ मध्ये आपले जीवन संपवले. पंजाब, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि अन्य राज्यांत बड्या जमीनदारांनी शेतकरी संघटनांचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी करून घेतला. सामान्य अल्पभूधारक शेतकरी संघटनेपासून दूर गेला. ज्या बड्या जमीनदारांनी संघटनेच्या सामर्थ्याचा उपयोग करून घेतला, ते राजकीय पक्षाशी संधान बांधून सत्तेत वाटा मिळवण्याच्या प्रयत्नास लागले.

**शेतकरी चळवळ थंडावण्याची कारणे**

१९८० साली शेतकरी संघटना प्रथम महाराष्ट्रात शरद जोशी यांनी स्थापन केली. शेतमालास योग्य भाव मिळवणे हे संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होते. तत्त्वत: शेतमालाचे भाव उत्पादन खर्चावर आधारलेले असावेत हे शासनास मान्य झाल्यानंतर व ज्या मागणीसाठी सुरू केलेली चळवळ यशस्वी झाल्यानंतर थांबायला हवी होती तशी ती थांबली नाही. त्यामुळे शेतमालाशिवाय अन्य मागणीसाठी तिचा उपयोग होत आहे असे दिसताच चळवळीत भाग घेणारे कार्यकर्ते दूर गेले व चळवळ निष्प्रभ झाली. सुप्रसिद्ध इतिहास लेखक बिपीनचंद्र म्हणतात, 'चळवळ कोठे थांबवावी हे जसे नेत्यांना कळले नाही तसेच ती कोठे पुन्हा सुरू करावी हेही समजले नाही. महात्मा गांधींना मात्र याची पुरेपूर जाणीव होती. शेतकरी चळवळ उद्दिष्ट प्राप्तीनंतर थांबवणे आवश्यक होते. तशी जाण असलेले नेते शेतकरी संघटनेला लाभले नाहीत.

शेतकरी चळवळीस यश आल्यानंतर शेतकरी संघटनेचे बडे शेतकरी राजकीय पक्षात गेले आणि राजकीय पक्षाच्या आधारे सत्तेत वाटा मिळवण्याच्या प्रयत्नास लागले. शेतकऱ्यांच्या हितसंबंधास दुय्यम स्थान मिळाले किंवा अशा बड्या शेतकरी नेत्यांनी शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले त्यामुळे शेतकरी संघटना योग्य नेतृत्वास मुकली.

शेतकरी पक्षाचे नेते राजकीय लोभापोटी पक्षामध्ये व सत्तेमध्ये सहभागी झाले व शेतकरी यांपासून दूर गेले. म्हणून चळवळ थंड झाली.



वस्तुत: शेतकरी संघटना अन्य सामाजिक संघटनांप्रमाणे राजकीय पक्षाशी संलग्न नव्हती, किंबहुना राजकीय पक्षच आपल्या पक्षाची एक शाखा म्हणून संघटना स्थापन करीत असत. परंतु शेतकरी संघटना राजकीय पक्षनिरपेक्ष होती. मात्र शेतकरी संघटनेने सुरू केलेली शेतकरी चळवळ जशी प्रभावी होऊ लागली, तिने केलेल्या मागण्या शासनाकडून मान्य होऊ लागल्या तसे या संघटनेकडे राजकीय पक्ष अपेक्षेने पाहू लागले. त्याचप्रमाणे शेतकरी संघटनेचे नेतेही संघटनेची शक्ती पाहून करू लागले. स्वत:ला राजकीय पक्षात स्थान मिळावे व त्या आधारे सत्तेची फळे चाखावीत अशी अभिलाषा करू लागले. उदाहरण म्हणून ज्यांनी प्रथमत: शेतकरी संघटनेची महाराष्ट्रात बीजे रुजवून तिला प्रभावशाली केली त्या शरद जोशींचे घेता येईल. ते राजकीय पक्षाबरोबर निवडणुकीत उतरले. त्यांनी महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांवरती संघटनेचे कार्यकर्ते उभे केले. पण त्यात त्यांचा दारुण पराभव झाला. त्यानंतर त्यांनी केंद्रात राष्ट्रीय लोकशाहीचे आघाडीचे सरकार आले, त्या वेळी आघाडीने सत्तेत प्रवेश करण्याचे निमंत्रण देताच त्यांनी तत्काळ सत्ताधाऱ्यांनी दिलेली मानाची पदे स्वीकारली, शेतकरी संघटनेत ज्या सहकाऱ्यांनी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम केले, त्यांनाही न विचारता ते सत्ताधाऱ्यांच्या आश्रयाला गेले. परिणामी, शेतकरी संघटनेचा संस्थापक, खंदा कार्यकर्ता दूर होताच, संघटना निष्प्रभ झाली व संघटनेला घरघर लागली. थोड्या फार फरकाने अशीच परिस्थिती निरनिराळ्या राज्यांत ज्या नेत्यांनी शेतकरी चळवळ प्रभावी केली, तेही शेतकऱ्यांची दु:खे, दारिद्र्य, समस्या सोडून देऊन राजकीय पक्षाप्रमाणे काम करू लागले. उत्तर प्रदेशचे महेंद्रसिंग टिकैत, तामीळनाडूचे नेते नायडू यांच्याबरोबरच गुजरात, कर्नाटक, पंजाब येथील शेतकरी संघटनेच्या नेत्यांनीही राजकीय पक्षांशी संधान बांधले व सार्वत्रिक निवडणुकात उतरले, पण त्यांनाही शरद जोशी यांच्याप्रमाणेच अपयशाचे धनी व्हावे लागले. परिणाम असा झाला की, कोणाही नेत्याला सत्ताधारी पक्षात मानाचे स्थान मिळाले नाही आणि त्यांच्यावर मूळ राज्यांतील शेतकरी संघटनेचा असा विश्वास राहिला नाही. 'तेलही गेले अन् तूपही गेले' अशी त्यांची अवस्था झाली. पण अत्यंत दु:खदायक गोष्ट ही की, शेतकरी चळवळीला कोणी त्राता राहिला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची दु:खे, समस्या जगाच्या आणि राज्याच्या वेशीवर टांगून त्या सोडवण्यासाठी कोणीच त्राता राहिला नाही.

महाराष्ट्रापुरता विचार करावयाचा झाल्यास, शरद जोशींसारखा अभ्यासू, पोटतिडकेने काम करणारा नेता, शेतकरी चळवळीतून आणि शेतकरी संघटनेतून दूर गेल्याने संघटनेची शकले उडाली. दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य

दर देत नाहीत असे दिसताच श्री. राजू शेट्टी यांनी स्वतःचा 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' असा वेगळा पक्ष काढून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून देण्याची मोहीम हाती घेऊन विधीमंडळाची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले. पुढे लोकसभेचेही खासदार झाले. दरम्यान ऊस उत्पादकांना कोणीतरी आपली दुःखे दूर करणारा देवदूत आल्याचा भास झाला. पण श्री. राजू शेट्टी 'स्वाभिमानी शेतकरी संघटने'चे नेते न राहता राजकीय पक्षाचे नेते झाले. अन्य राज्यातही तपशिलाचा किंचितसा फरक वगळता शेतकरी संघटनेच्या वाट्याला असेच दुःख आले.

प्रारंभी शेतकरी संघटनेने ग्रामीण भागातील जनतेची वा धान्य उत्पादकांची दीन अवस्था शासनासमोर मांडली, त्याचे प्रतीक म्हणून शरद जोशींनी ग्रामीण जनतेचा 'भारत' व शहरी लोकांचा 'इंडिया' असा भेद करून ग्रामीण जनतेचा मागासलेपणा, शासनकर्त्यांचे त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष याकडे राज्यकर्त्यांचे लक्ष वेधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पण काळाच्या ओघात शेतकरी संघटनेचे हे प्रयत्न अधुरेच राहिले.

शेतकरी संघटनेचे निरपवाद महत्त्व लक्षात घेता, राजकीय विचारवंत प्रा. व. मं. सिरसीकर म्हणतात, 'शेतीप्रधान भारतात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी संघटनेची गरज ही कायम आहे', हे खरेच आहे.

## विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

**प्रश्न १ : खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.**

१. भारतातील शेतकऱ्यांचे पहिले बंड ...... साली झाले.

*(अ) १७५१ (ब) १७५७ (क) १७८३ (ड) १८५७*

२. स्वातंत्र्यपूर्ण काळात हैद्राबाद संस्थानात ........ या संस्थानिकाविरुद्ध राष्ट्रीय चळवळ सुरू झाली.

*(अ) रझाकार (ब) निजाम (क) पटेल (ड) पेशवे*

३. हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करण्याची पोलिसी कारवाई ........ १९४८ रोजी झाली.

*(अ) १५ ऑगस्ट (ब) १३ सप्टेंबर*

*(क) २१ सप्टेंबर (ड)१९ ऑक्टोबर*

४. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची स्थापना ...... यांनी केली.

(अ) राजू शेट्टी (ब) मधुकरराव चौधरी

(क) शरद पवार (ड) शरद जोशी

५. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची चळवळ ...... या मालाच्या पडलेल्या भावावरून सुरू झाली.

(अ) ऊस (ब) डाळ (क) कांदा (ड) ज्वारी

**प्रश्न २ : टीपा लिहा.**

(अ) आंध्रातील शेतकरी चळवळ

(ब) स्वाभिमानी शेतकरी संघटना

(क) शेतकरी चळवळीतील कम्युनिस्टांचा प्रभाव

(ड) आदिवासी चळवळ.

**प्रश्न ३ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी चळवळीचा मागोवा घ्या.

२. तेलंगणातील शेतकरी चळवळीची फलश्रुती काय झाली?

३. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या कार्याची माहिती द्या.

४. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ का थंडावली?

❖❖❖